# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२६

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**सोमवार, दिनांक २९ जून, २०२६ / आषाढ ८, १९४८ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) महसूल मंत्री** | |
| **(२) वने मंत्री** | |
| **(३) आदिवासी विकास मंत्री** | |
| **(४) कृषी मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(५) सामाजिक न्याय मंत्री** | |
| **(६) रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री** | |
| **(७) मदत व पुनर्वसन मंत्री** | |
| **(८) मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४३**

---

### रायगड जिल्ह्यातील नादुरुस्त खारभूमी बंधाऱ्यांमुळे भातशेती, नारळ व मत्स्यशेतीचे नुकसान होत असल्याबाबत

**(१) * ९६९७ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **खारभूमी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील खाडी किनाऱ्यावरील खारभूमी बंधाऱ्यांची मोठ्या प्रमाणावर पडझड व दुरवस्था झाल्यामुळे भरतीचे खारे पाणी शेतात शिरून भातशेती, नारळ व मत्स्यशेतीचे प्रचंड नुकसान होत असल्यामुळे खाडी किनाऱ्यावरील शेती व्यवसाय अडचणीत आल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्ह्यातील खारबंदिस्ती व बंधाऱ्यांच्या मजबुतीकरणासाठी सुमारे ७५ कोटी ८६ लाख रुपयांच्या निधीचा प्रस्ताव गत ४ वर्षांपासून मंजुरीकरिता प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रलंबित प्रस्तावामुळे खारबंदिस्तीचा प्रश्न गंभीर बनला असून, आगामी पावसाळ्यापूर्वी या बंधाऱ्यांची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी स्थानिक शेतकरी आणि ग्रामस्थांकडून सातत्याने केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर निधी मंजूर करण्यासाठी तसेच पावसाळ्यापूर्वी बंधाऱ्यांची तातडीने दुरुस्ती करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले :** (१) हे खरे नाही.

बृहत आराखड्यानुसार रायगड जिल्ह्यात १६५ योजना राबविण्यात येत असून यामुळे २२,५५९ हेक्टर क्षेत्र संरक्षित करण्याचे नियोजित आहे. या १६५ योजनांपैकी १३६ खारभूमी योजना पूर्ण झाल्या असून २०,१२७ हेक्टर क्षेत्र पुन:प्रापित झाले आहे.

बहुतांश योजनांचे नूतनीकरण होऊन १५ वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला आहे. अतिवृष्टी, येणारी वादळे,येणारी मोठे उधाणे यामुळे मोठ्या उधाणाच्या वेळी बांधाला खांडी जाऊन पाणी शेतीत जाण्याच्या घटना घडतात, परंतु लेखाशीर्ष २४०२ विस्तार व सुधारणा अंतर्गत खारभूमी योजनांच्या बांधाची दुरूस्ती केली जाते. त्यामुळे बांधाची पडझड व दुरावस्था झाल्यामुळे भरतीचे खारे पाणी शेतात शिरून भातशेती, नारळ व मत्स्यशेतीचे नुकसान होणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

रायगड जिल्ह्यातील मागील ४ वर्षात राज्यनिधी अंतर्गत २१ योजनांच्या नूतनीकरणासाठी ७६.२८ कोटीची मंजूरी मिळाली आहे. २१ कामांपैकी १२ कामे पूर्ण झाली असून या अंतर्गत ५३५ हेक्टर क्षेत्र संरक्षित झाले आहे. उर्वरीत योजनांची ९ कामे प्रगतीपथावर असून अंतिम टप्प्यात आहेत. त्यांतर्गत २०८२ हेक्टर क्षेत्र संरक्षित झाले आहे. तसेच कोंकण आपत्ती सौम्यीकरणांतर्गत सन २०२४ मध्ये १४ कामांना ८६.६० कोटी निधीची मंजूरी मिळाली असून सदरची कामे प्रगतीपथावर असून अंतिम टप्प्यात आहेत. त्यांतर्गत १८९४ हेक्टर इतके क्षेत्र संरक्षित होणार आहे. तसेच राज्यनिधी अंतर्गत सन २०२६ मध्ये ५ योजनांना प्रशासकीय मान्यता मिळाली असून त्याअंतर्गत ९४ हेक्टर क्षेत्र संरक्षित होणार आहे.

(३) हे खरे नाही.

सन २०२४-२५ व सन २०२५-२६ मध्ये विस्तार व सुधारणांतर्गत रुपये ४७.०० कोटी निधी मंजूर झाला असून या विभागांतर्गत ८० योजनावरील दुरुस्तीच्या कामांची निविदा काढण्यात आलेली आहे. सदर कामे प्रगतीपथावर आहेत. त्यामुळे पावसाळापूर्वी भातशेती, नारळ व मत्स्यशेतीचे नुकसान होणार नाही याची दक्षता घेण्यात आलेली आहे. तसेच सन २०२६-२७ मध्ये लेखाशीर्ष २४०२ खाली रुपये २०.०० कोटी निधीची तरतूद करण्यात आली असून योजनांची पाहणी करून आवश्यक तेथे कामे प्रस्तावित करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुक्ताईनगर (जि.जळगाव) येथील शासकीय विश्रामगृह परिसरात जेरबंद केलेल्या बिबट्याला अमानुष मारहाण केल्याबाबत

**(२) * ९३८६ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर (जि.जळगाव) येथील शासकीय विश्रामगृह परिसरात दिनांक १२ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यादरम्यान शिरलेल्या आणि वन्यजीव संरक्षण अधिनियमाच्या अनुसूची-१ मध्ये समाविष्ट असलेल्या बिबट्याला वनविभागाने भूल देणारे इंजेक्शन देऊन जेरबंद केल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मोहिमेदरम्यान बिबट्याला भूल दिल्यानंतर तो बेशुद्धावस्थेत असताना, घटनास्थळी उपस्थित असलेल्या काही व्यक्तींनी आणि जमावाने तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी व त्यांच्या समर्थकांकडून त्या मुक्या प्राण्याला लाठ्या-काठ्यांनी अमानुष मारहाण करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बेशुध्द प्राण्याला संरक्षण देण्याऐवजी त्याला जमावाकडून मारहाण होत असताना, तिथे उपस्थित असलेले वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी दखल न घेतल्याने कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला असून अनुसूचित-१ मधील प्राण्याला अशा प्रकारे मारहाण करणे हा दखलपात्र गुन्हा असताना, संबंधित लोकप्रतिनिधी, त्यांचे समर्थक आणि जबाबदार वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्यावर वन्यजीव संरक्षण कायद्यान्वये आतापर्यंत कोणते गुन्हे दाखल करण्यात आले आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) हे खरे आहे.

दिनांक १२ एप्रिल, २०२६ रोजी जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर नगरपंचायत शहर परिसरातील शासकीय विश्रामगृह परिसरात बिबट वन्यप्राणी आढळून आला. सदर बिबट वन्यप्राण्यास भूल देणारे इंजेक्शन देऊन जेरबंद करण्यात आले.
(२) जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर नगरपंचायत शहर परिसरात दिनांक १२ एप्रिल, २०२६ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्रामगृह परिसरात वन्यप्राणी बिबट असल्याबाबतची माहिती सकाळी अंदाजे १०.०० वाजेच्या सुमारास स्थानिकांकडून वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.), मुक्ताईनगर यांना मिळाली. वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.), मुक्ताईनगर हे वनकर्मचारी यांच्यासह तात्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि बिबट वन्यप्राण्याचे रेस्क्यु कार्य सुरु केले. सदर रेस्क्यु दरम्यान बिबट मानवी वस्तीकडे जाऊ लागल्याने तेथे उपस्थित नागरिकांनी स्वसंरक्षणासाठी सदर बिबट वन्यप्राण्यास प्रतिबंध केला असण्याची शक्यता आहे.
(३) मुक्ताईनगर (जि.जळगाव) येथील शासकीय विश्रामगृह परिसरात जेरबंद केलेल्या बिबट्याला झालेल्या अमानुष मारहाणीबाबत सहायक वनसंरक्षक (मृद व कॅम्पा), जळगाव यांना सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन अहवाल अभिप्रायासह सादर करणेबाबत कळविण्यात आले होते.

त्या अनुषंगाने सहायक वनसंरक्षक (मृद व कॅम्पा), जळगाव यांनी दिनांक ०४/०६/२०२६ रोजी अभिप्रायासह अहवाल सादर केला आहे. त्यानुसार सदर प्रकरणात घटनास्थळी उपस्थित तहसिलदार मुक्ताईनगर, पोलीस निरीक्षक मुक्ताईनगर, वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.), मुक्ताईनगर, पशुवैद्यकीय अधिकारी, मुक्ताईनगर व मानद वन्यजीव रक्षक, जळगाव यांचेकडील उपलब्ध स्थळ निरीक्षण अहवाल, प्रत्यक्षदर्शींचे जबाब, उपलब्ध चित्रफित तसेच बिबट बचाव कार्यवाहीशी संबंधित सर्व बाबींचा सखोल अभ्यास करून, त्यानुसार बिबट वन्यप्राण्यास वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२ शासनाच्या प्रचलित मार्गदर्शक सूचना तसेच NTCA च्या मार्गदर्शक सूचनांनुसार वनविभाग, महसूल प्रशासन, पोलीस यंत्रणा व पशुवैद्यकीय अधिकारी, मुक्ताईनगर, मानद वन्यजीव रक्षक, जळगाव यांच्या समन्वयाने नियोजनबध्दपणे कोणतीही इजा न होता सुरक्षितरीत्या जेरबंद करुन यशस्वी रेस्क्यु करण्यात आले. तसेच सदर कार्यवाही दरम्यान मानवी जीवितास किंवा मालमत्तेस कोणतीही हानी अथवा अप्रिय घटना घडलेली नाही. त्यामुळे घटनास्थळी उपस्थित असलेल्या कोणावरही गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: कोकण व विदर्भात मानवनिर्मित वणव्यांच्या घटनांमध्ये वाढ झाल्याबाबत

**(३) * ८६६० श्री.सुनिल शिंदे, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, श्री.विक्रांत पाटील, श्री.अमित गोरखे, श्री.सत्यजीत तांबे, श्री.संजय खोडके, श्री.विक्रम काळे, श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे मार्च ते एप्रिल, २०२६ दरम्यान आणि तत्पूर्वी विविध भागांतील जंगलांना भीषण वणवे लागण्याच्या घटनांमध्ये प्रचंड वाढ झाली असून रत्नागिरी जिल्ह्यातील खेड (चाकाळे बौध्दवाडी), परशुराम घाट परिसर तसेच गाणे-खडपोली (दसपटी विभाग) (चिपळूण) येथे भीषण वणवा लागला असल्याचे, तसेच गुढे पाचगणी (ता.शिराळा, जि.सांगली) डोंगरांना लागलेल्या आगीमुळे चांदोली खोऱ्यातील जैवविविधता धोक्यात आली असून अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर मालदाड परिसर, अकोला आणि सिन्नर (नाशिक) वनक्षेत्रात लागलेल्या आगीत दंडकारण्य अभियानातून लावलेली हजारो झाडे जळून खाक झाली असून पेठ आणि कळवण भागातही वणवे पेटले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भारतीय वन सर्वेक्षण अहवालानुसार राज्यात गत काही महिन्यांत सुमारे साडेआठ हजार वणव्यांच्या घटनांची नोंद झाली असून, इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात सर्वाधिक वणवे लागल्याची माहिती माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली असून सन २०२३-२४ या वर्षात राज्यातील एकूण १६ हजार ८ आगीच्या घटनांमध्ये सुमारे १२ हजार ००३ हेक्टर वनक्षेत्र आगीच्या विळख्यात सापडले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोकणातील एकूण वणव्यांपैकी सुमारे ९०% वणवे हे मानवनिर्मित असून विदर्भातील गडचिरोली, गोंदिया, भंडारा व चंद्रपूर जिल्ह्यात तेंदूपत्ता व मोहफुले संकलनासाठी मानवनिर्मित वणवे लावले जात आहेत, गडचिरोली जिल्ह्यात सर्वाधिक ७ हजार ४२ आगीच्या घटना घडल्या असून यामुळे राज्याचे सुमारे एक तृतीयांश वनक्षेत्र प्रभावित झाले असून चिपळूणमध्ये एका ७० वर्षीय वृध्द महिलेचा वणव्यात होरपळून दुर्दैवी मृत्यू झाला आहे, या वणव्यांमुळे कोकणातील काजू-आंबा बागांचे, झाडे, रोपे, गवत, दुर्मिळ वनसंपत्ती व वन्यजीवांची मोठ्या प्रमाणावर होरपळ व हानी होऊन जमिनीची सुपीकता घटणे, जनावरांच्या चाऱ्याचा तुटवडा, विजवाहिन्या व स्थानिक पर्यटन व्यवसायावर प्रतिकूल परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दुर्गम भागात रस्त्यांचा अभाव, पाण्याचे स्त्रोत नसणे, फायरलाईनची (जाळरेषा) कमतरता आणि कमजोर मोबाईल नेटवर्क यामुळे आगीवर वेळेत नियंत्रण मिळवणे कठीण होत आहे, तसेच वन विभागात निधीअभावी जाळरेषांची कामे प्रलंबित असणे, आग विझवण्यासाठी आधुनिक ब्लोअर्स, फायर प्रूफ जॅकेट्स, रिअल-टाइम मॉनिटरिंग सिस्टम यांसारखी आधुनिक साधने आणि सुरक्षेचे कवच व प्रशिक्षण पुरेसे नसल्याने, झाडांच्या फांद्यांनी आग विझविताना कर्मचाऱ्यांचे नाहक बळी जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, वणवा नियंत्रणासाठी वन विभागाने आधुनिक यंत्रसामग्री व उपकरणांच्या खरेदीसाठी शासनाकडे अंदाजे १०० कोटी रुपयांच्या निधीची मागणी करणारा प्रस्ताव सादर केला आहे काय, सदर प्रस्तावावर शासनाने काय निर्णय घेतला आहे व तो प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत, तसेच या संपूर्ण

वणव्यांच्या घटनांची आणि मालदाड डोंगर परिसरातील आगीच्या कारणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले असून या वणव्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना व बाधितांना तातडीने मदत व नुकसान भरपाई देण्यासाठी तसेच भविष्यात वणवे रोखण्यासाठी शासनाने कोणती ठोस व दीर्घकालीन आधुनिक उपाययोजना व जनजागृती मोहीम हाती घेतली आहे वा घेण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) हे अंशत: खरे आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील खेड (चाकाळे बौध्दवाडी) परशुराम घाट परिसर, चिपळूण तालुक्यातील गाणे (खडपोली) (दसपटी विभाग) तसेच शिराळा तालुक्यातील गुढे पाचगणी येथे लागलेल्या बहुतांश आगी ह्या मालकी क्षेत्रातील आहेत.

नाशिक वनविभागातील कळवण, पश्चिम भाग नाशिक मध्ये वनवणव्याच्या काही घटना दिसून आलेल्या आहेत. नियतक्षेत्र मालदाड राखीव वनक्षेत्र बाधित झालेबाबत आरोपी यांचेवर गुन्हा दाखल केल असून पुढील तपास सुरु आहे. मौजे मालदाड येथील वनवणव्यामुळे आसपासच्या शेतकऱ्यांचे कोणतेही नुकसान झालेले नाही. या ठिकाणी जाळरेषा घेण्यात आल्यामुळे क्षेत्रिय कर्मचारी यांना वेळीच वनवणवा आटोक्यात आणला आहे. दंडकारण्य अभियानातून लागवड करण्यात आलेल्या रोपवनामध्ये कोठेही आगीच्या घटना घडलेल्या नाहीत.

(२) भारतीय वन सर्व्हेक्षण यांचेकडून प्राप्त होणारे ॲलर्टस हे सॅटेलाईट वर आधारीत असतात. ज्यामध्ये शेतातील कचरा जाळणे किंवा खाजगी क्षेत्रातील आगीचाही समावेश असतो त्यामुळे सर्वच ॲलर्टस हे वनवणवे नसतात. सन २०२३-२४ या वर्षात एकूण ५११७ आगीच्या घटना घडलेल्या असून ११५८०.७०७ हे. जळीत क्षेत्र आहे.

(३) कोकण तसेच विदर्भासह बहुतांश वणवे हे मानव निर्मित किंवा मानवी निष्काळजीपणामुळे लागतात. यावर नियंत्रण मिळविण्यासाठी वनविभागाकडून सातत्याने जनजागृतीचे कार्यक्रम घेतले जातात. गडचिरोलीमध्ये जाने-२०२६ ते एप्रिल-२०२६ मध्ये एकूण ९३०२ फायर ॲलर्ट प्राप्त झाले असून २०५५ वनगुन्हे नोंद झालेले आहेत. तसेच २२६६.६३७ हे. एवढे वनक्षेत्र जळालेले आहे.

चिपळूण तालुक्यातील मौजे खडपोली गावामध्ये गाणे राजवाडा या भागात खाजगी क्षेत्रात आग लागल्याच्या ठिकाणी एका वृध्द महिलेचा मृत्यू झाला आहे. आग लागलेले ठिकाण हे वनक्षेत्र नसून होते. जमिनीची सुपीकता घटणे, जनावरांच्या चाऱ्याचा तुटवडा व स्थानिक पर्यटन यावर वनवणव्यामुळे होणारा प्रतिकुल परिणाम टाळण्यासाठी वनविभागामार्फत जाळरेषा घेणे. अग्निसंरक्षण मजुर लावणे, जनजागृती करणे, वनवे लागताच तात्काळ विझवणे इ. उपाययोजना करण्यात येत आहेत.

(४) वन विभाग जंगलातील आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी सातत्याने आणि प्रभावीपणे प्रयत्नशील आहे. दुर्गम भागांमध्ये वायरलेस यंत्रणेव्दारे तात्काळ संपर्क साधून आगीवर वेळेत नियंत्रण मिळवण्याचे काम केले जात आहे. तसेच रिअल-टाईम मॉनिटरिंग सिस्टिमसाठी AI Based Camera चा वापर पेंच व्याघ्र प्रकल्प तसेच इतर ठिकाणी केला जात आहे. याव्यतिरिक्त वेळेवर Fire Alerts प्राप्त होण्यासाठी FSI च्या वनअग्नि पोर्टलवर वन अधिकारी व कर्मचारी यांची नोंदणी करण्यात येत आहे. आग विझवण्यासाठी लागणारी साधन सामुग्री खरेदी करण्यासाठी विविध योजना जसे की केंद्र पुरस्कृत योजना

(Forest Fire Prevention and Management Scheme) राज्य योजना, जिल्हा योजना इ. योजनांमधून वनवणवा विझवण्यासाठीची आधुनिक साधने, सुरक्षेची साधने प्रशिक्षण इ. साठी निधीची तरतुद करण्यात येत आहे.

(५) राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (NDMA) यांना माहे सप्टेंबर २०२५ मध्ये रक्कम रुपये ५३.६० लक्षचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यानुषंगाने केंद्र शासनाने त्यास माहे मार्च-२०२६ मध्ये रक्कम रुपये ४७७३.०० लक्ष अनुदानास मंजुरी प्रदान केलेली आहे. निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांचेकडून सुरु आहे.

मालदाड येथे लागलेल्या आगीबाबत चौकशी करण्यात आली असून आरोपीवर वनगुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. तसेच इतर ठिकाणी लागलेल्या आगीबाबत देखील गुन्हे नोंदविण्यात आलेले आहेत.

वनवणव्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

१. प्रतिबंधात्मक उपाय म्हणून वनक्षेत्रात जाळरेषा घेण्यात येतात.

२. आग विझविण्यासाठी प्रशिक्षीत अधिकारी/कर्मचारी वनमजुर यांचे फायर फायटींग पथक तयार करण्यात येते व त्यांना आवश्यक साधन सामग्री उपलब्ध करुन देण्यात येते.

३. जंगलामध्ये आग लागल्याची माहीती SMS व्दारे तात्काळ प्राप्त करण्यासाठी विभागीय स्तरावरील व क्षेत्रिय स्तरावर अधिकारी/कर्मचारी यांचे फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडियाच्या संकेतस्थळावर नोंदणी करण्यात येते.

४. वनवणवा निर्दशनास येताच तात्काळ भारतीय वन अधिनियम १९२७ अन्वये वनगुन्हा नोंदवुन प्रकरणी चौकशी करण्यात येते.

५. आगीपासून वनांचे संरक्षण करणेकरीता विभागीय स्तरावर वनवणवा नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले असून सहाय्यक वनसंरक्षक यांना केंद्रस्थ अधिकारी म्हणून नियुक्ती करुन क्षेत्रिय स्तरावर वनपरिक्षेत्र अधिकारी यांना केंद्रस्थ अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येते. तसेच जंगलात कोठेही आग लागल्यास संबंधित परिक्षेत्राला तात्काळ कळविण्यात येतात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विभाग स्तरावरुन प्राप्त करुन घेतला जातो.

६. हॅलो फॉरेस्ट टोल फ्री Helpline सेवाः लोकांकडून वन वनक्षेत्रातील वणव्यांची, अवैध घटनांची माहिती/ तक्रार प्राप्त होण्यासाठी हॅलो फॉरेस्ट ही हेल्प लाईन सेवा टोल फ्री क्र. “१९२६” वर कार्यान्वित आहे.

-----------------

**उमरझरी (ता.साकोली, जि.भंडारा) येथील महिलेवर वाघिणीने हल्ला केल्याबाबत**

**(४) * ९१४५ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरझरी (ता.साकोली, जि.भंडारा) परिसरात शेतात काम करणाऱ्या एका शेतकरी महिलेवर वाघिणीने हल्ला करून तिला गंभीर जखमी केल्याची घटना माहे मार्च, २०२६ मध्ये वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले असून, सदर जखमी महिलेला वेळेवर मदत आणि योग्य उपचार न मिळाल्याने, संतप्त ग्रामस्थांनी साकोली-तिरोडा राज्यमार्ग तसेच व्याघ्र प्रकल्पाचे प्रवेशद्वार रोखून धरल्याने परिसरात दीर्घकाळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित परिसरात नरभक्षक वाघिणीचा वावर वाढलेला असतानाही वन विभागाने तिचा बंदोबस्त करण्यासाठी किंवा मानवी वस्तीत तिचा शिरकाव रोखण्यासाठी पुरेशी गस्त व प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या नसल्यामुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होऊन सार्वजनिक शांततेचा भंग होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीत दोषी आढळलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच वन्यप्राण्यांच्या मानवी वस्तीतील शिरकावावर नियंत्रण मिळवण्यासाठी व भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आणि बाधितांना तात्काळ आर्थिक मदत व उपचार मिळवून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) दिनांक २८/०३/२०२६ रोजी श्रीमती माया रामकृष्ण सोनवाणे, रा. उमरझरी, ता.साकोली, जि.भंडारा ही महिला शेतात मिरची पिकाच्या तोडणीकरीता गेले असता, टी-२७ या वाघीणीने त्यांच्यावर हल्ला करुन गंभीररित्या जखमी केल्याची घटना घडली, ही बाब खरी आहे.

त्यानंतर जखमी महिलेची स्थिती गंभीर असल्याने महिलेचा औषधोपचार खाजगी रुग्णालयात करण्यात यावा, या मागणीबाबत ग्रामस्थांनी साकोली-तिरोडा राज्यमार्ग रोखून धरला. तसेच संतप्त ग्रामस्थांनी साकोली-तिरोडा राज्यमार्ग तसेच व्याघ्र प्रकल्पाचे प्रवेशद्वार रोखुन धरल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, स्थानिक लोकप्रतिनिधी, पोलीस प्रशासन व वनविभागाचे अधिकारी यांच्या मदतीने तणावाची परिस्थिती आटोक्यात आणण्यात आली.

सदर जखमी महिलेला वनविभागामार्फत जे.बी. मल्टीकेअर हॉस्पीटल, नागपूर या खाजगी रुग्णालयात भरती करुन औषधोपचार करण्यात आले.

तथापि, सदर महिलेचा दिनांक ०१/०४/२०२६ रोजी रुग्णालयात दुर्देवी मृत्यू झाला.

सदर मृत महिलेच्या वारसांना महाराष्ट्र वन्यप्राण्यांमुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान यांकरीता नुकसान भरपाई प्रदान करणे अधिनियम, २०२३ अन्वये अनुज्ञेय असलेली आर्थिक मदत रुपये १५.०० लक्ष वनविभाग, भंडारा मार्फत अदा करण्यात आली आहे. उर्वरित रक्कम रुपये १०.०० लक्ष यथाशीघ्र अदा करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(२) व (३) सदर क्षेत्र हे नवेगाव-नागझिरा राखीव व्याघ्र क्षेत्राचे बफर क्षेत्रात येत असून टी-२७ वाघिणीस जेरबंद करण्यासाठी व मानव-वन्यजीव संघर्ष रोखण्यासाठी वनविभाग, भंडारा यांच्यामार्फत विविध उपाययोजना करण्यात आल्या.

- टी-२७ या वाघिणीच्या अस्तित्वामुळे मानवी जिवीतास धोका निर्माण झाल्याने, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ चे कलम ११(१)(क) अन्वये राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी ठरवून दिलेल्या प्रमाणभुत कार्यपध्दतीनुसार वाघिणीस जेरबंद करण्याच्या प्रस्तावाला प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडून मान्यता देण्यात आली होती.

- सदर वाघिणीला जेरबंद करण्यासाठी क्षेत्रिय कार्यालयामार्फत वारंवार प्रयत्न करण्यात आले असून, सदरचे नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प व भंडारा वनविभागाचे व्यापक वनक्षेत्र विचारात घेता वाघिणीला तातडीने पकडणे शक्य झाले नाही, ही बाब खरी आहे. दरम्यान, सदर वाघिणीला दिनांक २८/०६/२०२६ रोजी जेरबंद/पिंजराबंद करण्यात आले आहे.
- तसेच भविष्यात अशाप्रकारे मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्याकरीता वनविभागामार्फत विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत. उदा. उन्हाळ्यात वन्यप्राणी पिण्याच्या पाण्याच्या शोधात मानवी अधिवास क्षेत्रात येऊ नये, याकरीता जंगलातच नैसर्गिक पानवठ्यांसह कृत्रिम पानवठे, सिमेंट व गॅबीयन बंधारे तयार करण्यात येत आहेत.
- जंगलामध्ये वन्यप्राण्यांना मुबलक अन्न उपलब्ध व्हावे, याकरीता कुरण विकासाची व रोपवन विषयक कामे करण्यात येत आहेत.
- संयुक्त वनव्यवस्थापन समिती, स्वयंसेवी संस्था तसेच पर्यावरण व वन्यजीव संरक्षणासाठी काम करणाऱ्या व्यक्तींची व स्थानिक नागरिकांची वेळोवेळी मदत घेण्यात येते.
- तसेच प्राथमिक प्रतिसाद दल (पीआरटी) व जलद बचाव पथक (आरआरटी) यांचेमार्फत वन्य प्राण्यांचा मागोवा घेण्यात येतो व वन्यप्राणी मानवी वस्तीलगत येत असल्यास याबाबतची आगाऊ सूचना गावकऱ्यांना दिली जात आहे. त्याचप्रमाणे दवंडी, सभा इ. मार्फत गावकऱ्यांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विविध भागात अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याबाबत

**(५) * ९०९६ श्री.विक्रम काळे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.अमित गोरखे, डॉ.परिणय फुके, श्रीमती चित्रा वाघ, श्री.हेमंत पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.संजय खोडके, श्री.एकनाथराव खडसे, अ‍ॅड.निरंजन डावखरे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.विक्रांत पाटील, श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण विभागात झालेल्या वादळी वारा, गारपीट, अवकाळी पाऊस तसेच धुक्याच्या वाढत्या प्रमाणामुळे सुमारे १ लाख २२ हजार ९९३ हेक्टरहून अधिक क्षेत्रावरील शेतीपिके आणि फळबागांचे अतोनात नुकसान झाले असल्याचे माहे मार्च व एप्रिल २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नैसर्गिक आपत्तीमुळे गहू, हरभरा, ज्वारी, मका, कांदा यांसारखी पिके तसेच केळी, द्राक्षे, आंबा, काजू, संत्रा, डाळिंब, हळद, टरबूज व इतर फळबागा भुईसपाट झाल्या असून, जळगाव-अकोला यांसह अनेक ठिकाणी वीज पडून पशुधनाची (जनावरे/मेंढ्या) मोठी जीवितहानी झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केळी व द्राक्ष यांसारख्या फळपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असताना काही व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची अडवणूक करून कवडीमोल दराने शेतीमाल खरेदी केला जात असल्याच्या तक्रारी शासनास प्राप्त झाल्या आहेत काय, तसेच अशा व्यापाऱ्यांवर नियंत्रण आणण्यासाठी शासनाने कोणती कारवाई केली आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्याच्या विविध भागात (उदा. सांगलीतील वाळवा, मिरज, तासगाव, शिराळा, विटा परिसर) झालेल्या नुकसानीचे तातडीने 'ई-पंचनामे' पूर्ण केले आहेत काय, तसेच आपत्तीमुळे बाधित झालेल्या अल्पभूधारक तसेच २० हेक्टरपर्यंत क्षेत्र असलेल्या सर्व शेतकऱ्यांना व पशुधन गमावलेल्यांना शासनाच्या निकषानुसार तातडीने आर्थिक मदत/नुकसानभरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, कोकणातील फळबागायत व नगदी पिकांच्या संरक्षणासाठी तसेच हवामान बदलाशी निगडित विशेष योजना राबविण्याबाबत शासनाने कालबध्द आराखडा तयार केला आहे काय, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मकरंद जाधव (पाटील) :** (१) होय.

(२) होय.

(३) सद्य:स्थितीत तक्रारी प्राप्त नाही.

(४) बाधित क्षेत्राचे पंचनामे पूर्ण करुन पात्र लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात डिबीटी प्रणालीद्वारे निधी वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे मयत झालेल्या पशुधनाच्या नुकसानीकरीता पशुधन खरेदीसाठी शेतकऱ्यांना मदत वाटप करणे शक्य व्हावे, म्हणून (-) उणे प्राधिकार पत्रावर कोषागोरातून रक्कम आहरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे त्यानुसार जिल्हास्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) सद्य:स्थितीत कोणतीही विशेष योजना राबविण्यात येत नाही.

-----------------

## जालना-नांदेड समृध्दी महामार्गाकरिता नांदेड तालुक्यातील संपादित केलेल्या जमिनीचा शेतकऱ्यांना कमी मोबदला दिल्याबाबत

**(६) * ९१९५ श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना-नांदेड दरम्यानच्या समृद्धी महामार्गासाठी नांदेड तालुक्यातील १२ गावांतील शेतकऱ्यांच्या जमिनींचे संपादन करताना त्यांना देण्यात आलेला मोबदला हा प्रचलित बाजारभावापेक्षा अत्यंत कमी असल्याच्या तक्रारी माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पातील बाधित शेतकऱ्यांनी 'संघर्ष समिती' गठीत करून जमिनीच्या मोबदल्याबाबत मा.उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात याचिका दाखल केली असून, सदर प्रकरण सध्या 'न्यायप्रविष्ट' असून देखील महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने 'इंटरचेंज' व अन्य तांत्रिक कामांच्या नावाखाली या मार्गावरील अतिरिक्त जमीन संपादित करण्यासाठी शेतकऱ्यांना नवीन नोटीसा बजाविल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बाधित शेतकऱ्यांनी आपल्या न्याय मागण्यांसाठी वारंवार आंदोलने व निवेदने देऊनही, प्रशासनाकडून त्याकडे दुर्लक्ष करून मनमानी पध्दतीने प्रक्रिया राबविली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकल्पासाठी बाधित शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन, त्यांच्या कायदेशीर मागण्यांचा विचार करून आणि मा.न्यायालयाच्या अंतिम निर्णयाचा आदर राखून काम सुरू करण्याबाबत शासनाने कोणती भूमिका घेतली आहे तसेच सदर प्रकल्पातील शेतकऱ्यांना इतर जिल्ह्यांच्या धर्तीवर समान व वाढीव मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) मोबदल्याच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाकडे तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.
(२) व (३) सदर प्रकल्पातील बाधित शेतकऱ्यांच्या संघर्ष समितीच्या दिनांक २७/०४/२०२६ रोजीच्या निवेदनामध्ये नमूद याचिका क्र. ६०८/२०२३ सदर निवेदनापुर्वीच दिनांक ०२/०१/२०२४ रोजी खारीज करण्यात आली आहे. सदर प्रकल्पाच्या इंटरचेंज साठी प्रसिध्द करण्यात आलेल्या अधिसुचनेस कोणत्याही न्यायालयाने स्थगिती दिलेली नाही. परिणामी बाधित शेतकऱ्यांनी त्यांच्या मागण्या/आक्षेपांबाबत महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (१९५५ चा ५५) मधील तरतुदीनुसार कार्यवाही सुरु आहे.
(४) व (५) सदर प्रकरणी प्रकल्पाच्या अनुषंगाने प्रसिध्द करण्यात आलेली अधिसुचना, मा.न्यायालयाचे निर्देश, मुल्यांकनाबाबतच्या तरतूदी विचारात घेऊन नियमोचित कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## रेवस (अलिबाग) बंदरातील प्रस्तावित रो-रो जेट्टीचे काम पूर्ण करण्याबाबत

**(७)** * **८६४३ श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रेवस (अलिबाग) आणि करंजा (उरण) दरम्यानच्या रेवस बंदरातील प्रस्तावित रो-रो जेट्टीचे काम गत तीन वर्षांपासून बंद असल्याने अलिबाग आणि उरण दरम्यानचा प्रवास पेणमार्गे रस्त्याने करावा लागत असल्यामुळे प्रवाशांचा वेळ आणि इंधन जास्त प्रमाणात खर्च होत असून सध्या वापरात असलेली जेट्टी अतिशय जुनी झाल्याने त्यावरून प्रवास करणे धोकादायक झाल्याची बाब दिनांक ३ मे, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अलिबाग आणि उरण/नवी मुंबई यांना जोडणाऱ्या या महत्त्वपूर्ण जलमार्गाचे काम कंत्राटदार अपूर्ण ठेवून सोडून गेल्यामुळे तसेच महाराष्ट्र मेरिटाइम बोर्डाच्या वेळकाढू धोरणामुळे नवीन कंत्राटदार नेमण्यास उशीर होत असल्यामुळे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रेवस-करंजा रो-रो सेवेमुळे पनवेल, उरण, अलिबाग आणि मुरुड तालुक्यातील नागरिकांचा वेळ वाचून इंधनाची मोठी बचत होणार असल्याने रेवस बंदरातील प्रस्तावित रो-रो जेट्टीचे काम पूर्ण झाले आहे काय, तसेच उक्त काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नितेश राणे :** (१) हे खरे नाही.

(२) कंत्राटदाराकडून रेवस जेट्टीचे काम संथ गतीने होत असल्यामुळे दिनांक १६/०२/२०२४ रोजी कंत्राटदाराचा मक्ता रद्द (Terminate) करण्यात आला आहे.

(३) रेवस जेट्टीच्या कामातील उर्वरित बाबी पूर्ण करण्याच्या रुपये ३७.०४ कोटीच्या कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता दिनांक १२ जून, २०२६ रोजीच्या शासन आदेशान्वये प्रदान करण्यात आली असून सद्य:स्थितीत निविदा प्रक्रिया पूर्ण करुन त्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार काम पूर्ण करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती रकमेत वाढ करण्याबाबत

**(८) * ९२३८ श्री.संजय खोडके, श्री.पंकज भुजबळ, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.अरुण लाड, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू नये यासाठी समाजकल्याण विभागामार्फत विविध शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत असून, सदर योजनेंतर्गत मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांमधील (शासकीय व खाजगी) इयत्ता ५ वी ते ७ वी च्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना केवळ ५० रुपये आणि इयत्ता ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना केवळ प्रतिमाह १०० रुपये शिष्यवृत्ती दिली जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाढती महागाई आणि शैक्षणिक खर्च लक्षात घेता, सदर शिष्यवृत्तीची रक्कम अत्यंत अल्प असल्याने त्यामध्ये भरीव वाढ करण्याबाबतचे निवेदन पालक व शिक्षण क्षेत्रातील विविध संघटनांनी दिनांक ४ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यादरम्यान शासनास दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, समाज कल्याण अधिकारी, बृहन्मुंबई यांनी सदर शिष्यवृत्तीच्या दरात सुधारणा करण्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास शासनाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली आहे, तसेच शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला आहे काय, असल्यास, वाढीव रकमेचे स्वरूप काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) माध्यमिक शाळेत शिकत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करणे या योजनेच्या शिष्यवृत्ती दरामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील घुग्घुस-शेणगाव शिवरस्त्याचा बेकायदेशीरपणे वापर होत असल्याबाबत

**(९) * ९४७१ श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घुग्घुस (जि.चंद्रपूर) परिसरातील शेतकऱ्यांच्या पिढ्यानपिढ्या वापराखाली असलेला घुग्घुस-शेणगाव शिवरस्ता हा 'लॉयड्स मेटल्स ॲण्ड एनर्जी लिमिटेड' कंपनीकडून ट्रक पार्किंग व औद्योगिक वाहतुकीसाठी वापरण्यात येत असल्याची बाब दिनांक ४ मार्च, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली असून महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदींनुसार शिवरस्ता हा केवळ शेती कामे व ग्रामस्थांच्या येण्या-जाण्यासाठी राखीव असताना प्रशासनाने सदर रस्त्याचा औद्योगिक वापर करण्यास बेकायदेशीरपणे परवानगी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीने सर्व्हे क्र.१७०/१ मधील अधिग्रहित जमिनीलगत असलेल्या या शिवरस्त्यावर ट्रक पार्किंगचे नियोजन केल्यामुळे स्थानिक शेतकरी व लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी व तहसीलदारांकडे लेखी तक्रारी केल्या असून, या औद्योगिक वाहतुकीमुळे शेती कामात अडथळा निर्माण होणे, अपघातांची भीती वाढणे आणि पावसाळ्यात पाण्याचा निचरा न झाल्याने पिकांचे नुकसान होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी स्थानिक प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही सदर रस्ता वापरासाठी मोकळा न करण्याऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच सदर शिवरस्त्यावरील संभाव्य अतिक्रमण व औद्योगिक वापर कायमस्वरूपी रोखण्यासाठी आणि उक्त रस्ता केवळ शेतीकामासाठीच खुला राहील याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) तक्रार प्राप्त झाली हे खरे आहे.

मुख्याधिकारी तथा नियोजन प्राधिकरण, नगरपरिषद घुग्घुस यांनी दिनांक २९/०५/२०२५ रोजीच्या आदेशान्वये, लॉयड्स मेटल ॲण्ड एनर्जी लि., घुग्घुस यांना मौजा-घुग्घुस स.नं.१७० आराजी १.९८ हे. आर म्हणजेच १९८००.०० चौ.मी. जमिनीवर औद्योगिक प्रयोजनार्थ (Truck Parking Lot) अटी व शर्तींच्या अधीन राहून विकासाची परवानगी देण्यात आलेली आहे. घुग्घुस-शेणगाव शिवरस्त्याचा वापर स्थानिक शेतकऱ्यांसोबतच लॉयड्स मेटल ॲण्ड एनर्जी लि., घुग्घुस या कंपनीकडून सुरु आहे. सदर रस्ता अडविलेला किंवा अतिक्रमण केल्याचे दिसून येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांना पीक विमा कंपन्यांकडून नुकसान भरपाईची रक्कम कमी दिल्याबाबत

**(१०) * ९४०३ श्री.सचिन अहिर, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.अमित गोरखे, डॉ.परिणय फुके, श्री.हेमंत पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील पीक विमा कंपन्यांनी सन २०१६ ते २०२५ या कालावधीत अंदाजे ७३,६३० कोटी रुपये आणि त्यापैकी केवळ महाराष्ट्रातून सुमारे १६,३०० कोटी रुपयांचा निव्वळ नफा कमावल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली असून नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान

होऊनही शेतकऱ्यांना मिळणाऱ्या भरपाईच्या तुलनेत विमा कंपन्यांना मिळणारा नफा हा अनेक पटींनी जास्त असल्यामुळे, या योजनेचा मूळ उद्देश साध्य होत नसल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विमा कंपन्यांकडून स्थानिक स्तरावरील नुकसानीचे पंचनामे करताना होणारी टाळाटाळ आणि तांत्रिक निकषांच्या नावाखाली शेतकऱ्यांचे दावे नाकारले जात असून विमा कंपन्यांनी स्वतःची जोखीम कमी करण्यासाठी बहुराष्ट्रीय कंपन्यांना पुनर्विमा हप्त्यापोटी अंदाजे २५ ते ३० हजार कोटी रुपये अदा केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पीक विमा योजनेची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी तसेच शेतकऱ्यांना योग्य व वेळेत विमा भरपाई मिळावी, विमा कंपन्यांवर नियंत्रण ठेवावे आणि योजनेत पारदर्शकता आणण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये विहित केल्यानुसार पीक विमा कंपन्यांचा नफा किंवा तोटा हा संबंधित वर्षातील एकूण नुकसान भरपाईच्या रकमेवर आधारित असतो.

सन २०१६ ते २०२४-२५ या कालावधीत प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत राज्यातील विमा कंपन्यांना एकूण रुपये ५२,५६३.२२ कोटी इतका विमा हप्ता अदा करण्यात आला आहे. या कालावधीत शेतकऱ्यांना देण्यात आलेली एकूण नुकसान भरपाई रुपये ३७,६२५.६९ कोटी इतकी आहे.

राज्य शासनाने सन २०२२ पासून विमा कंपन्यांचा नफा एकूण जमा विमा हप्त्याच्या २० टक्क्यांपर्यंत मर्यादित केला आहे. त्यानुसार विमा कंपन्यांना एकूण रुपये ८,५१६.९७ कोटी इतका निव्वळ नफा झाला असून विमा कंपन्यांनी रुपये ५,५८३.०३ कोटी इतका विमा हप्ता परतावा राज्य शासनास जमा केला आहे.
(२) स्थानिक पातळीवर पंचनामे विहित कालावधीत पूर्ण करणे, तांत्रिक कारणास्तव विमा दावे प्रलंबित किंवा नाकारणे, यासारख्या बाबी काही प्रमाणात आढळून आल्या आहेत. मात्र, यासंबंधातील तक्रारींच्या निराकरणासाठी तालुका, जिल्हा, विभागीय व राज्यस्तरीय तक्रार निवारण समित्या कार्यरत आहेत.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार पीक विमा उतरवलेल्या शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी विमा कंपन्यांनी पुनर्विमा (reinsurance) घेण्याची तरतूद आहे. त्यानुसार विमा कंपन्यांकडून कार्यवाही केली जाते.
(३) प्रधानमंत्री पीक विमा योजनेची अंमलबजावणी पारदर्शकरित्या करण्याच्यादृष्टीने तसेच, पीक विम्याची माहिती शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र शासनाने पीक विमा पोर्टल, शेतकरी ॲप, व्हॉट्सॲप चॅटबॉट, टोल फ्री क्रमांक इत्यादी सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत.

पीक विमा कंपन्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रत्येक तालुका स्तरावर, जिल्हा स्तरावर, विभागीय आयुक्त स्तरावर आणि राज्य स्तरावर तक्रार निवारण समित्या कार्यरत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील जादूटोणाविरोधी प्रचार व प्रसार समितीच्या बैठका होत नसल्याबाबत

**(११) * ९६११ श्री.सत्यजीत तांबे, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) 'महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानवीय, अनिष्ट व अघोरी प्रथा आणि जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत अधिनियम, २०१३' च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी स्थापन करण्यात आलेल्या 'जादूटोणाविरोधी कायदा प्रचार व प्रसार समिती'ची मागील चार वर्षांपासून एकही बैठक झाली नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१३ मध्ये कायदा अस्तित्वात येऊनही प्रशासकीय अनास्था आणि समितीच्या निष्क्रियतेमुळे राज्यात भोंदूगिरी, नरबळीचे प्रयत्न आणि अघोरी प्रथांचे प्रकार पुन्हा वाढले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक २ मार्च, २०२२ रोजी वा त्यादरम्यान सदर समितीची पुनर्रचना होऊनही, समितीचे पदसिध्द अध्यक्ष व सचिव यांच्या उदासीनतेमुळे ही समिती केवळ नाममात्र उरली असून, अघोरी प्रथांविरुध्दचा प्रचार व प्रसार पूर्णपणे बंद झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त समितीच्या या प्रदीर्घ निष्क्रियतेबाबत आणि कर्तव्यात कसूर करणाऱ्या संबंधित जबाबदार यंत्रणेवर शासनाने आतापर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच राज्यात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी आणि कायद्याची कडक अंमलबजावणी करण्यासाठी ही समिती तातडीने कार्यान्वित करून, दर तीन महिन्यांनी बैठकांचे बंधनकारक वेळापत्रक निश्चित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१) हे खरे नाही.

अंधश्रद्धा निर्मुलन कायद्याच्या अंमलबजावणी बाबतचा नियमित आढावा घेण्यात येत असून सन २०२२ ते सन २०२६ या कालावधीत विभागीय स्तरावर एकूण २९ व जिल्हास्तरावर एकूण १८१ बैठका घेण्यात आलेल्या आहेत.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

सदर कायद्याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्याकरीता पथनाट्य, भारुड व किर्तने, रॅली, कार्यशाळा, प्रशिक्षण कार्यक्रम, पोस्टर व बॅनर लावणे, वृत्तपत्र, सोशल मिडीया इत्यादीव्दारे प्रचार व प्रसिध्दी नियमितपणे करण्यात येत आहे.

-----------------

## राज्यातील शबरी आदिवासी घरकुल योजनेंतर्गत पात्र लाभार्थी घरकुलांपासून वंचित असल्याबाबत

**(१२) * ९४८३ श्री.अमित गोरखे, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.हेमंत पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जमातीतील बेघर किंवा कच्च्या घरात राहणाऱ्या कुटुंबांसाठी 'शबरी आदिवासी घरकुल योजना' राबविण्यात येत असून सन २०२१-२२ ते २०२४-२५ या चार वर्षांच्या कालावधीत ठरविलेले विहित लक्षांकाचे उद्दिष्ट पूर्ण न झाल्यामुळे राज्यातील सुमारे ६१ हजार १८६ पात्र लाभार्थी अद्यापही घरकुलाच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे एप्रिल, २०२६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील ज्या अनुसूचित जमातीच्या कुटुंबाची घरे कुडामातीचे आहेत किंवा अनुसूचित जमातीची जी कुटुंबे बेघर आहेत अशा अनुसूचित जमातीच्या पात्र लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजनेच्या धर्तीवर त्याच आर्थिक वर्षात घरे उपलब्ध करून देण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक ऊईके :** (१) अंशत: खरे आहे.
(२) i. शबरी आदिवासी घरकुल योजनेतंर्गत ग्रामीण क्षेत्रातील लाभार्थ्यांची निवड करण्याकरीता दिनांक १७ ऑक्टोबर २०२३ च्या शासन निर्णयानुसार अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. परंतु मंजूरी देण्यास विलंब होत असल्याने मा.मुख्यमंत्री महोदयांच्या दिनांक ०३ फेब्रुवारी २०२५ रोजीच्या बैठकीतील सूचनांप्रमाणे आदिवासी विकास विभागाकडून दिनांक १२ जून २०२५ च्या शासन निर्णयान्वये शबरी आदिवासी घरकुल योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीकरीता प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) च्या धर्तीवर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे अध्यक्षतेखाली समिती पुनर्गठित करण्यात आली आहे.

ii. तसेच सद्य:स्थितीत, ग्रामविकास विभागाच्या दिनांक ०४/०४/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सन २०२४-२५ ते सन २०२८-२९ या कालावधीसाठी राज्यातील, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, आदिवासी विकास विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांचेकडून विविध प्रवर्गाकरीता राबविण्यात येणाऱ्या राज्य पुरस्कृत घरकुल योजनांचा (शबरी आदिवासी घरकुल योजना सहित) लक्षांक प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत देण्यात येणार असून यापुढे शबरी आदिवासी घरकुल (ग्रामीण) योजनेंतर्गत स्वतंत्रपणे नव्याने वेगळे उद्दिष्ट देण्यात येणार नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अवैध वाळू उपसा व वाहतूक रोखण्यासाठी विशेष यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत

**(१३)** * **९६५१ श्री.कृपाल तुमाने, श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अवैध वाळू उपसा व अनधिकृत वाहतूक रोखण्यासाठी तसेच संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी महसूल विभागामार्फत 'विशेष भरारी पथके' नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, सदर पथकांमध्ये महसूल विभागाव्यतिरिक्त पोलीस, आरटीओ व इतर संबंधित विभागांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाळू उत्खनन व वितरण प्रक्रियेतील गैरप्रकार रोखण्यासाठी आणि सर्वसामान्यांना स्वस्त दरात वाळू उपलब्ध करून देण्यासाठी 'ई-निविदा/ई-लिलाव' पध्दत अधिक प्रभावीपणे लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे तसेच नवीन वाळू धोरणातील नियमांची कठोर अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी आणि उत्खनन क्षेत्रावर देखरेख ठेवण्यासाठी 'ड्रोन सर्व्हे' किंवा 'जीपीएस'सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात गत दोन वर्षांत अवैध वाळू उपसा प्रकरणी किती जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले व त्यातून शासनाला किती दंड वसूल झाला आहे,
(४) असल्यास, अवैध वाळू उपसा पूर्णपणे बंद करण्यासाठी आणि नवीन धोरणाचे उल्लंघन करणाऱ्यांवर 'महाराष्ट्र जमीन महसूल संहिता' व 'एमपीडीए' सारख्या कायद्यांतर्गत कठोर कारवाई करण्यासाठी शासनाने कोणती विशेष यंत्रणा कार्यान्वित केली वा त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) गौण खनिजाच्या अवैध उत्खनन/वाहतुकीवर प्रभावी नियंत्रण ठेवणे शक्य व्हावे, यासाठी तहसिल, उप विभाग, जिल्हास्तरावर व विभागीय स्तरावर पोलीस, परिवहन विभागातील अधिकारी/कर्मचारी व महसूल अधिकारी / कर्मचारी यांची स्वतंत्र भरारी / दक्षता पथके स्थापन करण्याची तरतूद वाळू/रेती निर्गती धोरण-२०२५ दिनांक ०८/०४/२०२५ मध्ये केली आहे. सदर पथकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील अवैध उत्खनन व वाहतुकीस अटकाव करणे ही या पथकाची सामुहिक जबाबदारी आहे.
(२) वाळू/रेती निर्गती धोरणामध्ये वाळूच्या विल्हेवाटीसाठी ई-लिलाव पध्दतीचा अवलंब करण्याची तरतूद केली आहे. वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूक होऊ नये यासाठी वाळू घाटाच्या ठिकाणी २४X७ छायाचित्रण करण्यासाठी CCTV बसविणे, वाळूची वाहतूक GPS असलेल्या वाहनांमधून करणे व वाळू गटांचे ताबे देताना व ताबे काढून घेताना ड्रोनद्वारे चित्रिकरण करण्याची तरतूद उक्त धोरणामध्ये केली आहे.
(३) मागील दोन वर्षामध्ये २७१२ जणावर अवैध वाळू उपसा व वाहतूक प्रकरणी गुन्हे दाखल केले असून त्यामधून रुपये ११९.१४ कोटी इतका महसूल जमा झाला आहे.
(४) व (५) वाळू व इतर गौण खनिजाची अवैध/अनधिकृत उत्खनन, वापर, वाहतूक व तस्करीमध्ये आढळून आलेल्या व्यक्ती यांच्यावर महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदीनुसार केवळ दंडात्मक कारवाई न करता संबंधितांविरुध्द फौजदारी कारवाई करण्याबाबतच्या सूचना दिनांक १७/०७/२०२५ च्या शासन परिपत्रकान्वये क्षेत्रिय यंत्रणांना दिल्या आहेत. तसेच, MPDA Act, १९८१ मधील तरतूदीनुसार वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूक केल्याबद्दल गुन्हा नोंदविलेल्या इसमाकडून पुन्हा तोच गुन्हा घडल्यास अशा इसमाविरुध्द प्रतिबंधात्मक स्थानबध्दतेची कारवाई करण्याबाबतही सूचना क्षेत्रिय यंत्रणेला दिल्या आहेत.

दिनांक ०१/०४/२०२५ ते दिनांक ३१/०५/२०२६ पर्यंत महाराष्ट्र जमीन महसूल सहितेनुसार अवैध वाळू वाहतूक व उत्खननच्या अनुषंगाने ८१६७ प्रकरणी कारवाई केली असून सदर कालावधीत MPDA अंतर्गत ४१ कारवाया केल्या आहेत.

-----------------

## राज्यातील आश्रमशाळांमधील गैरव्यवस्थापन आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत

**(१४) * ९५७९ श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आदिवासी विकास विभागांतर्गत ३०० पेक्षा जास्त शासकीय व अनुदानित आश्रमशाळा कार्यरत असून या आश्रमशाळांमध्ये शिक्षकांची वाढती अनुपस्थिती, व्यवस्थापनातील कथित गैरव्यवहार आणि विद्यार्थ्यांना पुरविल्या जाणाऱ्या निकृष्ट दर्जाच्या आहारामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा व शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आश्रमशाळांच्या कामकाजावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी असलेल्या नियंत्रक अधिकाऱ्यांकडून नियमानुसार नियमित भेटी व तपासणी केली जात नसल्यामुळे शाळा व्यवस्थापनावर प्रशासनाचे नियंत्रण राहिलेले नसून विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी व पारदर्शकतेसाठी बसविण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे बंद स्थितीत असून तक्रार निवारण पेट्या अकार्यान्वित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आश्रमशाळांमधील उक्त त्रुटी दूर करून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित जोपासण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही किंवा धोरणात्मक उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक ऊईके :** (१) हे खरे नाही.

राज्यात ५०० शासकीय आश्रमशाळा व ५५८ अनुदानित आश्रमशाळा कार्यरत असून विद्यार्थ्यांना निश्चित केलेल्या मांनकानुसार आहार पुरविण्यात येतो. तसेच वेळोवेळी याबाबत क्षेत्रिय अधिकाऱ्याकडून भेटी दरम्यान तपासणी केली जाते. शिक्षकांची आधारबेस ऑनलाईन प्रणालीव्दारे हजेरी नोंदविली जाते. शैक्षणिक गुणत्तावाढ व विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याकरीता विविध उपक्रम राबविण्यात येतात.

(२) हे खरे नाही.

शासकीय व अनुदानित आश्रमशाळांची नियमित तपासणी करण्यात येते. ५०० शासकीय आश्रमशाळांवर अंदाजे ५८२७ सी.सी.टी.व्ही व ५५८ अनुदानित आश्रमशाळावर ७४५६ सी.सी.टी.व्ही बसविण्यात आले आहेत. शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमध्ये तक्रार निवारण पेट्या ठेवण्यात आल्या असून आश्रमशाळास्तरावर दर १५ दिवसांनी तक्रारपेटी उघडून तक्रार नोंदवहीत नोंद घेऊन तक्रारीचे निवारण करण्यात येते.

(३) आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी विविध उपक्रम जसे की, माझी शाळा माझा स्वाभिमान, अभिव्यक्ती प्रकल्प, बालहक्क संरक्षण, डिजीटल शाळा इ. शैक्षणिक उपक्रम राबविले जातात.

शासकीय आश्रमशाळा व अनुदानित नियंत्रण आश्रमशाळांच्या कामकाजावर ठेवण्यासाठी क्षेत्रिय अधिकारी वेळोवेळी स्थळभेटी देऊन कर्मचारी उपस्थिती, विद्यार्थी उपस्थिती, विद्यार्थ्यांना देय सोयी सुविधा, विद्यार्थीनीची निवास व्यवस्था, कोठीगृह, स्वंयपाकगृह, भोजनव्यवस्था, पाणीव्यवस्था इ. पाहणी करतात. तसेच आश्रमशाळांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी मार्गदर्शन करतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विरार-अलिबाग मल्टिमॉडेल कॉरिडॉर प्रकल्पांतर्गत बाधित शेतकऱ्यांना भूसंपादनाचा वाढीव मोबदला मिळण्याबाबत

**(१५) * ९३७३ श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विरार-अलिबाग मल्टिमॉडेल कॉरिडॉर या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी सन २०२३ मध्ये निर्धारित करण्यात आलेली मोबदल्याची रक्कम आता कमी करण्याचे प्रस्तावित असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील काही वर्षांत भूसंपादनाच्या निश्चितीअभावी शेतकऱ्यांच्या जमिनींचे हस्तांतरण किंवा वापर प्रलंबित राहिल्याने त्यांना झालेल्या आर्थिक नुकसानीची भरपाई म्हणून शासन मूळ मोबदल्याव्यतिरिक्त कोणतीही अतिरिक्त ‘विलंब भरपाई’ देणार आहे काय,

(३) असल्यास, लोकहिताच्या प्रकल्पासाठी जमीन देण्यास शेतकऱ्यांचा विरोध नसताना, वाढीव मोबदल्याच्या मागणीऐवजी पूर्वीचे दर कमी केल्यामुळे बाधित शेतकरी व जमीन मालकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, प्रचलित बाजारभाव आणि वाढती महागाई विचारात घेऊन शेतकऱ्यांना न्याय व मोबदला मिळवून देण्यासाठी शासनस्तरावर यापूर्वीचे दर कायम ठेवण्याबाबत किंवा त्यात वाढ करण्याबाबत तसेच या प्रकल्पातील भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आणि दर निश्चितीमधील संभ्रम दूर करण्यासाठी राज्य स्तरावर विशेष समिती नियुक्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) सार्वजनिक प्रयोजनासाठी लागणाऱ्या खाजगी जमिनीच्या संपादनामध्ये जमिनीचे मुल्यांकन करताना प्राथमिक अधिसुचने पुर्वीच्या १ वर्षातील खरेदी विक्री व्यवहार वगळण्याबाबतचे शासन परिपत्रक दिनांक २४/०१/२०२३ मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.८२९६/२०२३ व इतर संलग्न याचिकावरील दिनांक २४/१२/२०२५ च्या आदेशान्वये रद्द केले आहेत. मा.न्यायालयाच्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी, पालघर, ठाणे व रायगड यांच्यामार्फत संपादनाखालील जमिनीच्या फेरमुल्यांकनाची कार्यवाही सुरु आहे.

(२), (३), (४) व (५) सदर प्रकल्पासाठी आवश्यक जमिनीसाठीची प्राथमिक अधिसूचना, मुल्यांकनाबाबतच्या तरतूदी आणि मा.न्यायालयाचे निर्देशानुसार जमिनीचे मुल्यांकन करण्यात येत असल्याने मूळ मोबदल्याव्यतिरिक्त विलंब भरपाईचा प्रश्न उद्‌भवत नाही. सदर प्रकल्पाशी निगडीत पालघर आणि ठाणे जिल्ह्यातील फेरमुल्यांकनाबाबतची कार्यवाही पूर्ण झाली असून रायगड जिल्ह्यातील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

प्रसंगत: नमूद करण्यात येते की, संपादनाखालील जमिनीच्या वाढीव मुल्यांकनाबाबत भूधारकांना महाराष्ट्र राज्य महामार्ग अधिनियम, १९५५ खाली नियुक्त लवाद तथा विभागीय आयुक्त यांच्याकडे दाद मागण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर येथील मिटमिटा भागात सफारी पार्कसाठी अतिरिक्त शासकीय जमीन हस्तांतरित करण्याबाबत

**(१६) * ९२२६ श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.पंकज भुजबळ, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगरमधील मिटमिटा येथे शासनाने झुलॉजिकल पार्कसाठी जागा दिली असून, त्यालगत असलेली १७ एकर अतिरिक्त शासकीय जमीन सफारी पार्क प्रकल्पासाठी मिळण्याबाबत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने जिल्हा प्रशासनाकडे (महसूल विभाग) मागील पाच वर्षांपूर्वी सादर केलेला प्रस्ताव जिल्हा स्तरावर किंवा शासन स्तरावर प्रलंबित असल्याने जमिनीअभावी सफारी पार्कच्या विस्तारीकरणाचे काम सुरु झाले नसल्याचे दिनांक २६ मार्च, २०२६ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, छत्रपती संभाजीनगर हे 'राज्याची पर्यटन राजधानी' असूनही, इतक्या महत्त्वपूर्ण पर्यटन प्रकल्पाचा जमीन हस्तांतरणाचा प्रस्ताव गेल्या ५ वर्षांपासून प्रलंबित राहण्याची नेमकी तांत्रिक किंवा प्रशासकीय कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सफारी पार्कचे काम प्रत्यक्षात सुरू होण्याच्या दृष्टीने सदर १७ एकर जागा महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्याबाबत विशेष बाब म्हणून तातडीने निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२), (३) व (४) शासनाने दिनांक १७/१०/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मौजा मिटमिटा, ता.जि.छत्रपती संभाजीनगर येथील गट क्रमांक ३०७ मधील ४० हेक्टर जमीन छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेस भोगाधिकार मूल्यरहित व महसूल मुक्त पध्दतीने प्रदान केली आहे. जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांनी सदर जमिनीचा ताबा महानगरपालिकेस दिला असून महानगरपालिकेच्या ताब्यातील ६० हेक्टर जमिनीवर सफारी पार्कचा आराखडा तयार करण्यात आलेला आहे.

प्राणीसंग्रहालयाचे ९०-९५% टक्के काम पूर्ण झाले असून यामध्ये प्राण्यांचे पिंजरे, अंतर्गत रस्ते, ड्रेनेस, संरक्षण भिंत, कर्मचाऱ्यांसाठी निवारा व प्राण्यासांठी दिल्या जाणाऱ्या इतर सुविधांचा समावेश आहे.

सफारी पार्ककरीता १७ हेक्टर अतिरिक्त जमिनाच्या प्रस्तावाबाबत शासनस्तरावरुन काही त्रुटी जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांना कळविल्या आहेत. सदर त्रुटींची पुर्तता करून सदर जमीन उपलब्ध करून देण्याबाबत उचित निर्णय घेण्यात येईल.

-----------------

## कोकण किनारपट्टीवरील मच्छिमारांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(१७) * ८७९१ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमेरिका, इस्रायल व इराण युद्धामुळे डिझेलचा अपुरा पुरवठा आणि वाढते दर यामुळे मुंबईसह संपूर्ण कोकण किनारपट्टीवरील मासेमारी बंद झाली असून, माहे एप्रिल, २०२६ च्या पहिल्या आठवड्यापर्यंत निम्म्याहून अधिक नौका किनाऱ्यावर केवळ उभ्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डिझेल टंचाईमुळे मच्छिमार यांच्यासह त्यांच्यावर अवलंबून असलेले मासळी विक्रेते, वाहतूकदार, बर्फ कारखाने आणि इतर पूरक लघुउद्योगांवर दुष्परिणाम होऊन हजारो कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बाधित झालेल्या मच्छिमार बांधवांना आणि संबंधित उद्योगांना आर्थिक स्थैर्य व उभारी देण्यासाठी विशेष आर्थिक पॅकेजची घोषणा करण्याबाबत तसेच डिझेल परतावा तात्काळ वितरित करण्याबाबत आणि सानुग्रह अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नितेश राणे :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशतः खरे आहे.
मागील काही दिवसापासून सुरु असलेल्या अमेरिका, इस्त्राइल व इराण युध्दाच्या पार्श्वभुमीवर निर्माण झालेल्या इंधन तुटड्यामुळे, देशामध्ये इंधनाचे दर वाढलेले आहेत, ही वस्तुस्थिती आहे. त्यानुसार महाराष्ट्रामध्ये डिझेलचे घाऊक दर (Bulk rates) किरकोळ दरांपेक्षा लक्षणीयरीत्या अधिक झालेले आहेत.तसेच सदरची दर वाढ कमी करण्याबाबत मच्छिमार सहकारी संस्था यांच्यामार्फत निवेदन सादर करण्यात आलेली आहेत.
(३) राज्यातील मच्छिमारांना आवश्यक असलेले डिझेल हे किरकोळ दर या प्रवर्गातून पुरवठा होण्याबाबत शासनाने दिनांक २३/०३/२०२६ रोजीच्या पत्रान्वये मा.केंद्रिय मंत्री, पदुम, भारत सरकार यांना कळविलेले आहे. सदरची बाब ही केंद्र शासन स्तरावरील धोरणात्मक बाब आहे. डिझेल परतावा या योजनेंतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता रुपये १२५.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे. सद्य:स्थितीत माहे जून, २०२६ मध्ये रुपये २५ कोटी इतका डिझेल परतावा वितरीत करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेकडून फेलोशिप जाहिरात प्रसिध्द करण्यास विलंब होत असल्याबाबत

**(१८) * ८८९४ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांनी सन २०२३ च्या पीएचडी संशोधकांसाठीची फेलोशिप जाहिरात अद्याप प्रसिध्द न केल्यामुळे राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाने बार्टीच्या महासंचालकांना नोटीस बजावली असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२३ च्या बॅचमधील पात्र विद्यार्थ्यांना फेलोशिपचा लाभ नाकारल्याबद्दल आयोगाने या प्रकरणाचे ३० दिवसांच्या आत सविस्तर स्पष्टीकरण सादर करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बार्टीसारख्या महत्त्वाच्या संस्थेकडून जाहिरात प्रसिध्द करण्यास होत असलेल्या विलंबामुळे सन २०२३ पासून प्रतीक्षेत असलेल्या हजारो पात्र अनुसूचित जातीच्या संशोधक विद्यार्थ्यांना आर्थिक फेलोशिपचा लाभ मिळण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच जाहिरात प्रसिध्द करण्यास झालेल्या या विलंब प्रक्रियेत कसूर करणाऱ्या संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. परंतु राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाने सूचना क्र. ESDW/ OL/ MH/ २०२६/ ३२९२१९ अन्वये BANRF-२०२३ जाहिरात प्रसिध्द न करण्याबाबत तथ्ये आणि माहिती सूचना प्राप्त होताच ३० दिवसांच्या आत आयोगास कळविण्याबाबत दिनांक १३/०४/२०२६ सूचित केले होते. त्याप्रमाणे सविस्तर अहवाल आयोगास दिनांक १६/०५/२०२६ रोजी पोस्टद्वारे पाठविण्यात आला आहे.

(३) मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक १९/१०/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार राज्यातील आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (टीआरटीआय), पुणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे, छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्था (सारथी), पुणे, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर व महाराष्ट्र संशोधन व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), मुंबई व इतर तत्सम स्वायत्त संस्थामार्फत कार्यान्वित असलेल्या अथवा करण्यात येणाऱ्या अधिछात्रवृत्ती, स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण कार्यक्रम, परदेश शिष्यवृत्ती, स्वयंम, स्वाधार, निर्वाह भत्ता, कौशल्य विकास व अन्य कार्यक्रमामध्ये आवश्यक समानता आणण्याकरीता सर्वंकष धोरण निश्चित करण्यात आले आहे. या अंतर्गत अ.मु.स.(वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली कायमस्वरूपी समिती गठीत करण्यात आली आहे.

टीआरटीआय, बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत व इतर तत्सम स्वायत्त संस्थांमार्फत सर्वंकष धोरणांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणींचा आढावा घेण्याच्या अनुषंगाने दिनांक ०४/०९/२०२५ व दिनांक ११/०९/२०२५ रोजी मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये सर्वंकष धोरणातील विविध योजनांमध्ये सुधारणा करण्यात आली असून त्यामध्ये अधिछात्रवृत्ती योजनेचा लाभ हा विविध उपरोक्त संस्थांना प्राप्त अर्जाच्या आधारे सरसकट न देता लाभार्थ्यांची संख्या निश्चित करण्यात आलेली असून सुधारित सर्वंकष धोरणासंबंधी प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही सुरु आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाने यु.जी.सी. (University Grants Commission) मार्फत विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन करून अधिछात्रवृत्ती योजनेचे निकष तयार करुन त्यासंबंधीचा अहवाल सादर केला आहे. सदर अहवालावर चर्चा करुन निर्णय घेण्यासाठी मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १७/०३/२०२६ रोजी बैठक घेण्यात आली आहे. सदर अहवाल स्विकारण्यात येवून अधिछात्रवृत्ती योजनेमध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेस उपलब्ध करून देण्याबाबत

**(१९) * ९०१२ श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असलेली 'भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना' सध्या निधीअभावी प्रलंबित असून, लाभार्थी निवडीसाठीची लॉटरी प्रक्रिया थांबविण्यात आल्याचे माहे मे, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाडीबीटी पोर्टलवर अर्ज सतत सुरू असल्याने राज्यातील लाखो शेतकऱ्यांनी या योजनेसाठी नोंदणी केली असून निधीच्या कमतरतेमुळे आणि महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत पात्र न ठरणाऱ्या सर्व शेतकऱ्यांचा भार या योजनेवर असल्याने हजारो पात्र शेतकरी अजूनही प्रतीक्षा यादीत किंवा लॉटरीच्या प्रतीक्षेत असून नवीन निधी वाटपानंतर यातील बहुतांश शेतकऱ्यांना लाभ मिळण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आर्थिक वर्ष २०२५-२६ आणि २०२६-२७ साठी या योजनेंतर्गत एकूण किती निधी मंजूर करण्यात आला होता आणि त्यापैकी प्रत्यक्षात किती निधी जिल्हास्तरावर वितरित करण्यात आला आहे तसेच सद्य:स्थितीत सदर योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करूनही केवळ निधी उपलब्ध नसल्यामुळे राज्यातील किती पात्र शेतकरी या योजनेच्या लाभापासून वंचित आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पावसाळा सुरू होण्यापूर्वी शेतकऱ्यांना फळबाग लागवडीचे नियोजन करता यावे यासाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले :** (१) नाही.

(२) होय.

(३) सन २०२५-२६ साठी रुपये १४८.३४ कोटी निधी उपलब्ध झाला आहे. सन २०२६-२७ करीता रक्कम रुपये १६५.०० कोटीची तरतूद मंजूर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील माणिकगड सिमेंट कंपनीसाठी अधिग्रहित केलेल्या जमिनीचा मोबदला न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांनी आत्महत्येचा प्रयत्न केल्याबाबत

**(२०) * ९८४५ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील माणिकगड सिमेंट कंपनीसाठी कुसुंबी, मोकारी व बाम्बेझरी या गावांतील १९ आदिवासी शेतकऱ्यांची जमीन अधिग्रहित करण्यात आली असून, या अधिग्रहणाबाबतचा कोणताही अधिकृत रेकॉर्ड किंवा कागदपत्रे स्थानिक उपविभागीय कार्यालयात उपलब्ध नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीतर्फे अधिग्रहित केलेल्या जमिनीचा योग्य मोबदला मूळ आदिवासी जमीन मालकांना मागील १५ वर्षांपासून अद्यापपर्यंत मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हक्काचा मोबदला न मिळाल्याने आणि प्रशासकीय उदासीनतेमुळे नैराश्यातून वरील जमिनीचे मूळ मालक असलेल्या ५ आदिवासी शेतकऱ्यांनी विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित पीडित आदिवासी शेतकऱ्यांना कंपनीमार्फत व शासनामार्फत तातडीने आर्थिक मोबदला व न्याय देण्यासाठी शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही. सदर १९ आदिवासी खातेदारांची जमीन संपादित करण्यात आलेली नाही.

(२) हे खरे नाही. सदर १९ आदिवासी खातेदारांची जमीन संपादित करण्यात आलेली नसल्याने, त्याबद्दलचे भुभाडे / मोबदला देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) दिनांक १३/०४/२०२६ रोजी ५ आदिवासी शेतकऱ्यांनी उपविभागीय अधिकारी कार्यालय, राजुरा येथे अनाधिकृत कृत्य करुन स्वत: जवळ बाळगलेल्या शिशिमधील पांढरे द्रव्य पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला आहे, ही बाब खरी आहे.

(४) प्रकरणात चौकशी करण्यात आलेली आहे. बाधित आदिवासी शेतकरी यांच्या तक्रारींच्या तपासणी करीता जिल्हाधिकारी स्तरावर बैठक घेण्यात येऊन भूमी अभिलेख विभागास मोजणी करण्यासंदर्भात निर्देश देण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पोमण (ता.वसई, जि.पालघर) येथे बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी केलेल्या भूसंपादनाच्या रकमेत गैरव्यवहार केल्याबाबत

**(२१)** * **१००२७ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) येथील पोमण गावच्या सर्व्हे क्रमांक १६४, हिस्सा क्रमांक १/२ मधील बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी संपादित होणाऱ्या जमिनीबाबत काही इसमांनी स्वतःची खोटी मालकी दर्शवून, बोगस व बनावट कागदपत्रे तयार करून संबंधित शासकीय अधिकाऱ्यांच्या संगनमताने मोठ्या प्रमाणावर वित्तीय अपहार केल्याची गंभीर बाब माहे एप्रिल, २०२६ च्या दुसऱ्या आठवड्यात किंवा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कोट्यवधी रुपयांच्या भू-संपादन मोबदला गैरव्यवहाराची राज्य शासनाने किंवा सक्षम प्राधिकाऱ्याने सखोल चौकशी केली आहे काय, त्या चौकशीचा सद्य:स्थितीतील अहवाल काय आहे,

(३) असल्यास, सदर प्रकरणी अधिकृत कराराचा/हक्काचा गैरवापर करून स्वतःच्या मालकीचे बोगस दस्तऐवज तयार करणाऱ्या मुख्य संशयितांवर आणि त्यांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत करणाऱ्या महसूल/भूसंपादन विभागाच्या संबंधित दोषी शासकीय अधिकाऱ्यांवर व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) मुंबई-अहमदाबाद अतिजलद रेल्वे प्रकल्पाच्या आखणीमधील जमिनीबाबतच्या निवाड्यामध्ये मौजे पोमण ता.वसई जि.पालघर येथील गोळा सर्व्हे क्र. १६४ मधील एकूण ०.०३९० हे. आर. जमिनींचा समावेश होता.तथापि, उप अधीक्षक भूमिअभिलेख, वसई यांच्याकडील दिनांक ११/०७/२०२३ च्या सुधारीत विवरणपत्रानुसार सर्व्हे क्र. १६४/१/२ मधील क्षेत्र संपादीत होत नसल्याचे दिसून आले.
(२) तसेच, उप अधीक्षक भूमि अभिलेख, वसई यांच्याकडील सुधारीत विवरणपत्रानुसार सर्व्हे क्र. १६४/२/१ मधील ०.०३९० हे. आर. क्षेत्र संपादीत होत असल्याने त्याबाबतचा मोबदला संबंधितांना अदा करण्यात आलेला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आदिवासी समाजाच्या जात प्रमाणपत्र वैधता प्रक्रियेमध्ये सुधारणा करण्याबाबत

**(२२) * १००९९ श्री.प्रमोद जठार :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी समाजातील लोकांना शासकीय, निमशासकीय व इतर लाभांसाठी जात वैधतेचा पुरावा सादर करावा लागतो मात्र, जात पडताळणीची ही विद्यमान प्रक्रिया अत्यंत किचकट व वेळखाऊ असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मधे वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन १९५० पूर्वीच्या जुन्या निकषांनुसार आवश्यक असलेल्या पुराव्यांच्या अभावी दुर्गम भागातील अनेक मूळ आदिवासी बांधव जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यापासून वंचित राहिल्याने त्यांना शैक्षणिक व नोकरीच्या विविध संधी नाकारल्या गेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास विद्यमान पडताळणी प्रक्रियेतील काही तांत्रिक त्रुटींचा गैरफायदा घेऊन बिगर आदिवासी व्यक्तींनी बोगस आदिवासी जात प्रमाणपत्रे व वैधता प्रमाणपत्रे मिळविल्याच्या तक्रारी शासनाच्या निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, किती बिगर आदिवासी व्यक्तींना बोगस आदिवासी जात प्रमाणपत्रे व वैधता प्रमाणपत्रे मिळाली आहेत व त्यांच्यावर शासनस्तरावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मूळ आदिवासींना सुलभतेने प्रमाणपत्र मिळण्यासाठी आणि बोगस प्रकरणांना आळा घालण्यासाठी जात पडताळणीच्या विद्यमान नियमांमध्ये व विहित कार्यपध्दतीमध्ये आवश्यक त्या सुधारणा करून प्रक्रिया सुटसुटीत व पारदर्शक करण्यासाठी शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक ऊईके :** (१) नाही.
(२) नाही.
(३) नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) अनुसूचित जाती/जमातीच्या लोकांना जात प्रमाणपत्र वैधता प्राप्त करण्यासाठी येत असलेल्या अडचणींचा अभ्यास करुन त्यावर उपाययोजना सुचविण्यासाठी दिनांक १४ जानेवारी, २०१९ च्या शासन निर्णयान्वये श्री.पी. व्ही. हरदास, माजी न्यायमुर्ती यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती. सदर समितीने शासनास केलेल्या शिफारशीनुसार, अधिनियम २००० व नियम २००३ मध्ये सुधारणा करण्याबाबत प्रस्ताव आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी सादर केला आहे. त्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील ‘चांदा’ आणि ‘ब्रह्मपुरी’ वन विभागातील मजुरांचे वेतन प्रलंबित असल्याबाबत

**(२३) * १०१८२ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील वन विभागात कार्यरत असणाऱ्या रोजंदारी वन मजुरांना मागील सात महिन्यांपासून मजुरी न मिळाल्याने त्यांच्यावर व त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विशेषतः ‘चांदा’ आणि ‘ब्रह्मपुरी’ वन विभागांतर्गत शेकडो मजुर मजुरी अभावी आर्थिक विवंचनेत असून, वन मजुरांच्या वेतनासाठी आवश्यक असणारा निधी शासनाकडून वेळेत उपलब्ध न झाल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर चांदा आणि ब्रह्मपुरी वन विभागांतर्गत कार्यरत असणाऱ्या सर्व मजुरांची प्रलंबित मजूरी तात्काळ देण्यासाठी आणि पुढील काळात वेतन वेळेत होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) व (२) चंद्रपूर जिल्ह्यातील मध्यचांदा, ब्रम्हपुरी व चंद्रपूर वनविभागात कार्यरत असलेल्या रोजंदारी मजुरांना मागील कालावधीतील प्रलंबित असलेली मजुरी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात माहे मार्च, २०२६ पर्यंत अदा करण्यात आलेली आहे.
(३) सन २०२६-२७ या चालू आर्थिक वर्षातील २ महिन्यांची रोजंदारी मजुरांची मजुरी अदा करण्याची कार्यवाही अनुदान उपलब्धतेनुसार क्षेत्रिय स्तरावर सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पैठण (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील तत्कालीन तहसिलदार यांनी अनधिकृत वीटभट्ट्या सुरु ठेवल्याबाबत

**(२४) * १०४३१ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पैठण (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यात आणि गोदावरी नदीच्या कडेला मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर वीटभट्ट्या सुरू असून या वीटभट्ट्यांसाठी आवश्यक असणारी रॉयल्टी न भरता, तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळाची कोणतीही परवानगी नसताना देखील तहसिलदारांनी त्यांच्यावर कारवाई न करता त्यांना संमती दिली असल्याने अनधिकृत वीटभट्ट्या सुरू ठेवण्यात येऊन अवैध मुरूम व वाळू उपसा करणाऱ्या भू-माफियांना अभय देऊन शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडविल्याची तक्रार स्थानिक सामाजिक संघटनेच्या कार्यकर्त्यांनी मा.महसूल मंत्री व मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे माहे, फेब्रुवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पैठणचे तत्कालीन तहसिलदार यांनी पैठण येथे दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० ते १९ मार्च, २०२१ व दिनांक ८ एप्रिल, २०२१ ते २४ ऑक्टोबर, २०२१ या कालावधीत कार्यरत असताना, त्यांनी शासन नियमानुसार बंधनकारक असलेला ‘लोकशाही दिन’ आपल्या संपूर्ण कार्यकाळात एकदाही आयोजित केला नसल्याचे चौकशीत आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निवासी उपजिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी तत्कालीन तहसिलदार यांना दिनांक २९ डिसेंबर, २०२५ रोजी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियमांतर्गत शिस्तभंगविषयक कारवाई करण्याबाबत नोटीस बजावली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने व महसूल विभागाने या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी केली आहे काय, सदर चौकशीत काय आढळून आले असून त्यानुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) पैठण तालुक्यातील अनधिकृत विटभट्ट्याबाबत तक्रारदार यांच्याकडून प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने ग्राम महसूल अधिकारी व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे क्षेत्रिय अधिकारी यांनी दिनांक १५/०४/२०२६ रोजी पैठण तालुक्यातील ५६ विटभट्टी तपासणी करण्यात आली. तपासणी दरम्यान विटभट्टी धारकाकडून रुपये ९,७४,३००/- रुपयाचे अकृषिक कर व इतर रक्कम शासन जमा करण्यात आलेली आहे. तहसिलदार, पैठण यांनी उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांना पैठण तालुक्यातील विटभट्टीधारकांवर नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.
(२) होय हे खरे आहे.
(३) व (४) तत्कालिन तहसिलदार, पैठण यांनी लोकशाही दिन आयोजित न करणे या कसुरीच्या अनुषंगाने त्यांना सक्त ताकीद देण्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांना सादर केला. त्यानुषंगाने, विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक २७/०५/२०२६ च्या आदेशान्वये तत्कालिन तहसिलदार, पैठण यांना सक्त ताकीद दिलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ‘एमआय फॉर ॲग्री-२०२६’ या जागतिक परिषदेसाठी झालेल्या शासकीय खर्चामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२५) * १०४८८ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वांद्रे येथील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे दिनांक २२ आणि २३ फेब्रुवारी, २०२६ रोजी झालेल्या ‘एमआय फॉर ॲग्री-२०२६’ जागतिक परिषदेचे आयोजनामध्ये आणि विविध कामांच्या कंत्राटांमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक अनियमितता झाल्याची माहिती माहे मे, २०२६ च्या दुसऱ्या आठवड्यात माहितीच्या अधिकारातून निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, सदरहू चौकशीच्या अनुषंगाने उक्त कार्यक्रमासाठी झालेल्या संपूर्ण खर्चाचे विशेष लेखापरीक्षण करण्यात आले आहे काय, त्यात नेमका किती रुपयांचा गैरव्यवहार किंवा वित्तीय नियमबाह्यता आढळून आली आहे,

(३) असल्यास, सदर प्रकरणी वित्तीय गैरव्यवहार करणाऱ्या व त्यास जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर/कंत्राटदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही. परंतु सदर खर्चाचे चालू वर्षी नियमित लेखापरीक्षण होणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई-विरार येथे आदिवासी समाजासाठी राखीव असलेल्या जमिनीवर अतिक्रमण केल्याबाबत

**(२६) * १०५१८ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रांतर्गत येत असलेल्या नायगाव व परिसरातील (जि.पालघर) शासकीय आणि आदिवासी समाजासाठी राखीव असलेल्या जमिनींवर मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे व भू-माफियांकडून अतिक्रमणे झाली असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी एकूण किती हेक्टर/आर क्षेत्रफळावर अतिक्रमण व अनधिकृत बांधकामे झाली असून यामध्ये महसूल व महानगरपालिकेचे कोणते अधिकारी, कर्मचारी किंवा मध्यस्थ सामील असल्याचे प्राथमिक चौकशीत निदर्शनास आले आहे,

(३) असल्यास, आदिवासी समाजाच्या हक्काच्या जमिनींवरील या अतिक्रमणाबाबत शासनाने आतापर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या तसेच इतर सर्वसंबंधित अधिकाऱ्यांच्या संशयास्पद भूमिकेबाबत व संगनमताच्या आरोपांबाबत शासनाने कोणती उच्चस्तरीय चौकशी सुरू केली आहे आणि दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२), (३), (४) व (५) वसई तालुक्यातील वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मौजे नायगांव येथे शासकीय अथवा आदिवासी मिळकतींवर अनधिकृत बांधकाम आढळून आलेले नाही. तथापि, त्या परिसरातील मौजे जुचंद्र, ता.वसई, जि.पालघर येथील स.नं/हि.नं २०९/अ/१ च्या सरकारी खांजण एकूण ४ एकर व व मौजे चिंचोटी, ता.वसई, जि.पालघर सरकारी स.नं ८५/३, ८५/४, ८५/५ व ८५/६ या सर्व्हे नं. च्या एकूण क्षेत्रापैकी ०-१२-०० हे.आर या जमिनीवरील अतिक्रमण करुन त्याठिकाणी अनधिकृतपणे बांधलेल्या अनुक्रमे १९८ व ५ खोल्यांचे बांधकाम निष्काषित करण्यात आले असून संबंधितांवर नायगाव पोलीस ठाणे येथे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील आदिवासींना प्रदान करण्यात आलेल्या मौजे कोल्ही येथील ०-३३-०० हे. आर, मौजे चिंचोटी येथील ०-७०-०० हे.आर, मौजे मोरी येथील ०-०८-०० हे.आर व मौजे कामण येथील ०-३५-०० हे. आर असे एकूण १-४६-०० हे.आर क्षेत्र आदिवासी व्यक्तींना नविन शर्तीने प्रदान करण्यात आलेले असून सदर ठिकाणी सक्षम प्राधिकाऱ्याची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता अनधिकृतरित्या बांधकाम झाल्याचे आढळून आले असून संबंधितांना नोटीस बजावून सुनावणीअंती नियमानुसार कार्यवाही करण्याचे नियोजित असल्याचे जिल्हाधिकारी, पालघर यांनी नमूद केले आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील उपरोक्त नमूद नायगांव व परिसरातील गावांव्यतिरिक्त अन्य गावातील शासकीय जमिनींवरील अनधिकृत बांधकामांबाबत शासन महसूल व वनविभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.जमीन-२०२६/प्र.क्र.२०/जमीन-१ दिनांक २५/०३/२०२६ अन्वये निवासी प्रयोजनाकरीता झालेली बांधकामे नियमानुकूल करणेची कार्यवाही करणेत येत असून नियमानुकूल होण्यास अपात्र असणारी अतिक्रमणे निष्कासित करणेबाबतची कार्यवाही करण्यात येणार आहे.

त्याचप्रमाणे आदिवासी व्यक्तींना नवीन शर्तीने प्रदान करण्यात आलेल्या मिळकतींवर अनधिकृत बांधकाम आढळून आल्यास सर्वप्रथम शर्तभंगाची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर प्रकरणी नियमानुसार कार्यवाही करणेत येत असल्याने यामध्ये महसूल व महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी किंवा मध्यस्थ सामील असल्याची बाब निर्देशनास आली नसल्याबाबत जिल्हाधिकारी, पालघर यांनी नमूद केले आहे.

-----------------

## जळगाव जिल्ह्यातील फळपीक विमा योजनेतील गैरव्यवहार प्रकरणी दोषी सार्वजनिक सुविधा केंद्रांवर कारवाई करण्याबाबत

**(२७) * ९६७६ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.योगेश टिळेकर, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती चित्रा वाघ, श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यात विशेषतः रावेर, यावल, मुक्ताईनगर, आणि जामनेर या भागांमध्ये केळी आणि इतर फळपिकांची प्रत्यक्षात कोणतीही लागवड नसताना, केवळ कागदोपत्री बोगस ७/१२ आणि खोट्या नोंदींच्या आधारे सुमारे ७५० कोटी रुपयांचा बनावट विमा उतरविण्यात आल्याचे कृषी विभागाच्या चौकशीत निष्पन्न झाले असल्याची बाब माहे मार्च, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृषी आयुक्तालय आणि जिल्हा प्रशासनाने केलेल्या संयुक्त चौकशीत अनेक सार्वजनिक सुविधा केंद्रांनी विमा कंपन्यांशी संगनमत करून मोठ्या प्रमाणावर बोगस अर्ज अपलोड केले असून उक्त गैरव्यवहार प्रकरणी दोषी आढळलेल्या सार्वजनिक सुविधा केंद्रांवर आणि संबंधित विमा प्रतिनिधींवर कडक कारवाई करण्याची शिफारस कृषी आयुक्तालयाने महसूल व गृह विभागाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कृषी आयुक्तालयाने पाठविलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली व अद्यापपर्यंत किती केंद्रांचे परवाने रद्द करण्यात आले तसेच दोषी अधिकारी व चालकांवर गुन्हे दाखल करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली व भविष्यात असे गैरप्रकार रोखण्यासाठी आणि पात्र शेतकऱ्यांना विम्याचा लाभ मिळवून देण्यासाठी शासनस्तरावर कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) व (२) होय.
जळगाव जिल्ह्यातील संबंधित पीक क्षेत्राची महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटरकडून रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञानाचा वापर करून तपासणी करण्यात आली असता ४४,०४१ हेक्टर क्षेत्रावर प्रत्यक्षात केळी पीक नसतानाही पीक विमा घेतल्याचे निदर्शनास आले आहे.

ज्या सामुहिक सुविधा केंद्रांमार्फत (CSC) वैयक्तिक स्तरावर मोठ्या प्रमाणात अयोग्य विमा प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत, अशा सामुहिक सुविधा केंद्राचे परवाने रद्द करण्याची प्रक्रिया सुरू करण्याबाबत जिल्हाधिकारी, जळगाव यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समन्वय समितीकडून प्रस्तावित करण्यात आले आहे.
(३) ज्या सामुहिक सुविधा केंद्रांमार्फत (CSC) वैयक्तिक स्तरावर मोठ्या प्रमाणात अयोग्य विमा प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत, अशा ४८ केंद्राच्या चालकांविरोधात तालुका कृषी अधिकारी यांच्याकडून गुन्हे दाखल करण्यात आले असून आर्थिक गुन्हे शाखेकडून तपासाची कार्यवाही सुरू आहे.
तपासाअंती दोषी आढळणाऱ्या केंद्रांचे परवाने रद्द करण्याची कारवाई करण्याचे प्रस्तावित आहे.

अशा प्रकारचे गैरप्रकार रोखण्यासाठी शासनामार्फत विविध उपाययोजना करण्यात येतात. यामध्ये, फळपीक विमा योजनेंतर्गत बोगस विमा घेणाऱ्या संबंधित अर्जदाराचा आधार क्रमांक पुढील ५ वर्षांसाठी काळ्या यादीत (Blacklist) टाकणे आणि त्यास किमान ५ वर्षांसाठी फळपीक विमा योजनेचा लाभ न देणे, याचा समावेश आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवापूर (जि.नंदुरबार) येथील शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्याच्या मृत्यूची चौकशी करण्याबाबत

**(२८) * ९४६४ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवापूर (जि.नंदुरबार) येथील शासकीय आश्रमशाळेमधील एका अल्पवयीन विद्यार्थ्याचा मृतदेह शाळेच्या परिसरातील टाकीत आढळल्याची धक्कादायक घटना दिनांक ५ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेमुळे राज्यातील आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत व प्रशासनाच्या निष्काळजीपणाबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले असून संबंधित आश्रमशाळेमध्ये सुरक्षा व्यवस्था व देखरेख व्यवस्थेतील त्रुटींमुळे व पाण्याच्या टाक्यांसारख्या धाकादायक ठिकाणांची सुरक्षितता न बाळगल्यामुळे अशा प्रकारची घटना घडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले तसेच संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच राज्यातील सर्व शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी विशेष सुरक्षा प्रोटोकॉल लागू करणे, नियमित तपासणी करणे व भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक ऊईके :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

(३) शासकीय माध्यमिक आश्रमशाळा बंधारे ता.नवापूर, जि.नंदुरबार येथे कु. ब्रायन राहुल गावीत इ. ३ री मध्ये शिक्षण घेत होता.सदर विद्यार्थी दिनांक ०३/०४/२०२६ रोजी दु. ३.०० पासून वसतिगृहातून बेपत्ता होता. त्याचा शोध घेवूनही तो आढळून न आल्याने नवापूर पोलीस स्टेशन येथे दिनांक ०४/०४/२०२६ रोजी पहाटे ३.०५ वा. प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यात आला. आश्रमशाळा व परिसरात परत त्याचा शोध घेतला असता दिनांक ०४/०४/२०२६ रोजी सकाळी १०.३० च्या सुमारास वसतिगृहाच्या मागील बाजूस संडासच्या टाकीत कु. ब्रायनचा मृतदेह आढळून आला. याबाबत कर्तव्यात कसूर केल्याने संबंधित मुख्याध्यापक व वसतिगृह अधीक्षक यांचेविरुध्द सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करुन त्यांना अटक करण्यात आली. तसेच दोघांनाही निलंबीत करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आयुक्तालयाने दिनांक २०/०५/२०२५ च्या पत्रान्वये सुचना दिल्या असून दिनांक ०२/०३/२०२६ च्या परिपत्रकान्वये विद्यार्थ्यांना घरी सोडण्यासाठी नियमावली विहित केली आहे. शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी नर्स नियुक्त करण्यात आल्या आहे. तसेच सुरक्षा रक्षक / चौकीदार नियुक्त करण्यात आले आहेत. आश्रमशाळांमध्ये CCTV बसविण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मत्स्यव्यवसाय क्षेत्रास नुकसानभरपाई देण्याबाबतची नियमावली जाहीर करण्याबाबत

**(२९) * ८६७१ श्री.सुनिल शिंदे, श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, अ‍ॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने मत्स्यव्यवसायाला कृषीचा दर्जा जाहीर केला असूनही प्रत्यक्षात नुकसान भरपाई, कर्जमाफी व अन्य सवलतीच्या बाबतीत मच्छीमारांना अपेक्षित लाभ मिळत नसल्याची बाब दिनांक २० एप्रिल, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून पालघर जिल्ह्यातील ११२ किलोमीटर किनारपट्टीवरील तलासरी, डहाणू, पालघर आणि वसई तालुक्यातील मच्छीमार समाजाला मासेमारीसाठी वापरल्या जाणाऱ्या जमिनीची कृषी जमीन म्हणून नोंद नसल्याने विविध लाभांपासून वंचित राहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नैसर्गिक आपत्ती, हवामानातील बदल, समुद्रातील अस्थिर परिस्थिती आणि इंधनाचे वाढते दर यामुळे राज्यातील मच्छीमार मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, मत्स्यव्यवसायाला कृषी दर्जा दिल्यानंतर त्याबाबत मार्गदर्शक सूचना आणि नियमावली अद्यापही जाहीर करण्यात आली नसल्याने मच्छिमारांना कोणते लाभ मिळणार याबाबत अनिश्चितता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मत्स्यव्यवसायाला कृषी निकषाप्रमाणे नुकसानभरपाई मिळण्यासाठी त्याबाबत मार्गदर्शक सूचना आणि नियमावली तातडीने जाहीर करण्याबाबत तसेच आंबा, चिकू व इतर कृषी उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांप्रमाणेच मत्स्यव्यवसाय करणाऱ्या मच्छिमारांनाही स्वतंत्र आर्थिक संरक्षण, सुलभ पतपुरवठा, विमा संरक्षण व आपत्ती निवारण सहाय्य मिळावे यासाठी राज्यस्तरीय स्वतंत्र मत्स्यव्यवसाय पतपुरवठा व पुनर्वसन आराखडा तयार करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नितेश राणे :** (१) कृषी क्षेत्राप्रमाणे राज्यातील मत्स्यव्यवसाय क्षेत्रास (प्रक्रिया उद्योग वगळता) कृषी समकक्ष दर्जा देण्यात आला आहे. याद्वारे राज्यातील मच्छिमार, मत्स्यसंवर्धक व मत्स्यकास्तकारांना (प्रक्रिया उद्योग वगळता) शेतकऱ्यांप्रमाणे विजदरात सवलत तसेच बँकाद्वारे दिल्या जाणाऱ्या खेळत्या भांडवली कर्जावर व्याज परतावा सवलत अंतर्भूत आहे.

पालघर जिल्ह्यात पालघर, वसई, डहाणू व तलासरी या तालुक्यात एकूण ५० गावे सागरी किनाऱ्यावरील आहेत. पालघर तालुक्यातील गावठाण जागेत राहणाऱ्या मच्छिमार बांधवांच्या जागेतील घराची नोंद ग्रामपंचायत कार्यालयात घेण्यात आलेली असून वसई, डहाणू व तलासरी या तालुक्यातील गावांच्या जागेत राहणाऱ्या घरांच्या जमिनी त्यांच्या मालकीच्या आहेत. तसेच या तालुक्यातील मच्छिमार बांधवांच्या मासे सुकविणे, जाळी सुकविणे, जाळी विणणे, बोटी दुरुस्त करणे इ. साठी शासकीय जमिनीचे ७/१२ च्या इतर हक्क नोंद घेण्यात आली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

जागतिक स्तरावरील निर्माण झालेल्या अस्थिर परिस्थितीमुळे इंधनाच्या दरात वाढ झाली आहे. राज्यातील मच्छिमारांना इंधन पुरवठा करण्याचे दर हे घाऊक दराऐवजी किरकोळ दराने पुरवठा होण्याबाबत दिनांक २३/०३/२०२६ रोजीच्या पत्रान्वये मा.केंद्रिय मंत्री, पदुम, भारत सरकार यांना विनंती करण्यात आली आहे. सदरची बाब ही केंद्र शासन स्तरावरील धोरणात्मक बाब आहे.

(३) मच्छिमार बांधवांना दिल्या जाणाऱ्या अल्पमुदतीच्या कर्जाच्या व्याजदरात सवलत देण्यासाठी योजनेच्या मार्गदर्शक सूचना शासन निर्णयात समाविष्ट आहेत. त्याचबरोबर विजदरात सवलत देण्याबाबत महावितरण विभागाकडून प्राप्त मार्गदर्शक सूचना, अर्ज नमूना ही निर्गमित करण्यात आला आहे.

(४) शेतकऱ्यांप्रमाणे मच्छिमार बांधवांना सुलभ व सवलतीच्या दरात पतपुरवठा होण्यासाठी बँकांकडून दिल्या जाणाऱ्या रुपये २.०० लाखापर्यंतच्या खेळत्या भागभांडवलावर व्याज परतावा सवलत लागू करण्यात आली आहे.

मच्छिमारांसाठी अपघात गटविमा योजनेंतर्गत मच्छिमार बांधवाचे मृत/अपघाती निधन झाल्यास रुपये ५.०० लक्ष व कायमचे अपंगत्व आल्यास रुपये २.५० लक्ष अर्थसहाय्य दिले जाते. या योजनेत मच्छीमार बांधवांची विमा रक्कम ही केंद्र व राज्य सरकारव्दारे भरण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोंदिया जिल्ह्यात बनावट कृषी औषधे व तणनाशकांचा पुरवठा होत असल्याबाबत

**(३०) * ९१५७ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुऱ्हाडी (ता.गोरेगाव, जि.गोंदिया) येथे तसेच जिल्ह्यात इतरत्र छत्तीसगड राज्यातील काही कंपन्यांकडून बनावट कृषी औषधे व तणनाशकांचा पुरवठा आणि विक्री होत असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बनावट कृषी औषधे व तणनाशक बाजारात कमीत कमी किमतीत उपलब्ध असून बनावट तणनाशकांमुळे तण नष्ट होण्याऐवजी पिकांची वाढ खुंटून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तसेच चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली तसेच सदर कंपन्यांच्या परवान्यांची तपासणी करण्याबाबत व कृषी केंद्रातून दिल्या जाणाऱ्या खते व किटनाशकांच्या विक्रीवर कडक नियंत्रण आणण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) छत्तीसगड राज्यातील रायपूर येथील कपंनीचे तणनाशक वापरल्याने मौजे तिमेझरी, ता.गोरेगाव, जि.गोंदिया येथील शेतकऱ्याने नुकसान झाल्याची तक्रार माहे एप्रिल, २०२६ मध्ये तालुका कृषी अधिकारी, गोरेगाव, जि.गोंदिया यांना तक्रार केली होती.

(२) तालुका तक्रार निवारण समितीने केलेल्या तपासणीमध्ये शेतकऱ्याचे २५-३० टक्के नुकसान झाल्याचे आढळून आले.
(३) कृषी निविष्ठा केंद्रातून दिल्या जाणाऱ्या खते व कीटकनाशकांच्या नमूना तपासणी नियमितपणे गुणवत्ता नियंत्रण निरीक्षकांकडून केली जाते. अप्रमाणित निविष्ठांवर कायद्यातील तरतूदीनुसार कारवाई केली जाते. सदर तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित कंपनीचे तणनाशकाचे संबंधित लॉटचे नमूने तपासणीसाठी कीटकनाशके चाचणी प्रयोगशाळा, अमरावती यांना पाठविण्यात आले आहेत. नमूना तपासणीचा अहवाल प्राप्त होताच किटकनाशके अधिनियम १९६८ व कीटकनाशके नियम १९७१ नुसार नियमोचित कारवाई करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गाच्या भूसंपादन प्रक्रियेत कोट्यवधी रुपयांचा अपहार झाल्याबाबत

**(३१)** * **९८०० श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गाच्या भूसंपादन प्रक्रियेत सुमारे रुपये ३१० कोटी रुपयांचा मोठा आर्थिक अपहार झाल्याप्रकरणी बीड येथील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात माहे मे, २०२६ मध्ये वा त्यासुमारास गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गंभीर आर्थिक अपहाराच्या चौकशीसाठी स्थापन करण्यात आलेल्या विशेष तपास पथकामार्फत (SIT) सुरू असलेल्या तपासात बीडचे तत्कालीन जिल्हाधिकारी व अन्य ४ वरिष्ठ शासकीय अधिकाऱ्यांना अटक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आर्थिक अपहाराची 'एसआयटी' (SIT) मार्फत चौकशी पूर्ण झाली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, चौकशीची सद्य:स्थिती काय आहे व त्यानुसार शासकीय निधीचा अपहार करणाऱ्या या सर्व दोषींवर कोणती कडक प्रशासकीय व फौजदारी कारवाई केली तसेच सदर महामार्गाच्या भूसंपादनात नुकसानग्रस्त ठरलेल्या मूळ पात्र शेतकऱ्यांना व जमीनधारकांना त्यांचा हक्काचा मोबदला मिळवून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय हे खरे आहे. सदर प्रकरणी चौकशीसाठी स्थापन करण्यात आलेल्या विशेष तपास पथकामार्फत (SIT) सुरू असलेल्या तपासात बीडचे तत्कालीन जिल्हाधिकारी, सहायक महसूल अधिकारी आणि २ कंत्राटी कर्मचाऱ्यांना पोलिसांमार्फत अटक करण्यात आली आहे.
(२) व (३) सदर प्रकल्पासाठी बीड जिल्ह्यातील संपादीत करण्यात आलेल्या जमिनीशी निगडीत प्रकल्पबाधित पात्र शेतकऱ्यांना भूसंपादन मोबदला यापुर्वीच अदा करण्यात आला आहे.
तसेच लवाद प्रकरणे आणि इतर मुद्द्यांबाबत तपासणी करण्यासाठी विभागीय आयुक्त यांच्यास्तरावर विशेष तपास पथकामार्फत (SIT) स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. विशेष तपासणी पथकाच्या अहवालानंतर पुढील कार्यवाही नियोजित आहे.

-----------------

## राज्यातील विशेषत: कोकण व मराठवाडा येथील आंबा व काजू उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(३२) * ९२०१ श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने, श्री.सदाशिव खोत, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण तसेच मराठवाडा विभागात अवकाळी पाऊस, तापमानातील चढ-उतार आणि फळमाशी, तुडतुडे व बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भावामुळे आंबा आणि काजू उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याची बाब माहे एप्रिल-मे, २०२६ च्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने कोकणातील पीकविमा नसलेल्या आंबा व काजू बागायतदारांना प्रति हेक्टर रुपये २२,०००/- नुकसानभरपाई जाहीर केली असली तरी, ती प्रत्यक्ष नुकसानीच्या तुलनेत अत्यंत तुटपुंजी असल्याने 'संपूर्ण कर्जमुक्ती' किंवा 'हेक्टरी ५ लाख रुपये नुकसानभरपाई' द्यावी अशी मागणी कोकणातून होत आहे; तर दुसरीकडे मराठवाड्यातील 'मॅन्गो ग्रोअर्स असोसिएशन' आणि 'महाकेशर आंबा बागायतदार संघ' यांनी कोकणाप्रमाणेच मराठवाड्यातील आंबा उत्पादकांनाही भरपाई मिळावी अशी मागणी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गोवा राज्याच्या धर्तीवर राज्यातील काजू उत्पादकांना अधिक दर मिळावा व प्रक्रिया उद्योगांना चालना द्यावी, तसेच बोगस खते व कीटकनाशके पुरवणाऱ्या कंपन्यांची चौकशी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी बागायतदारांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकऱ्यांना आधुनिक माहिती व तांत्रिक मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यासाठी देवगड येथे 'कृत्रिम बुद्धिमत्ता (AI)' तंत्रज्ञानावर आधारित अद्ययावत आंबा संशोधन केंद्र उभारण्याबाबत शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(५) असल्यास, शासनाने या नुकसानीचे पंचनामे पूर्ण केले आहेत काय, एकूण किती रुपयांचे नुकसान झाले आहे आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना वास्तववादी/वाढीव मदत देणे, कर्जमुक्ती करणे व मराठवाड्यातील शेतकऱ्यांना कोकणाप्रमाणेच मदत लागू करणे याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले :** (१) हे खरे आहे.

कोकण विभागात हवामान बदलामुळे आंब्याचे उत्पादन घटून आर्थिक नुकसान झाल्याचे निर्दशनास आले आहे. तसेच छत्रपती संभाजीनगर विभागात माहे एप्रिल, २०२६ या कालावधीत नैसर्गिक आपत्तीमुळे आंबा फळपिकाचे एकूण ११८.१० हे क्षेत्राचे नुकसान झालेले आहे. माहे मे, २०२६ या कालावधीत अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे झालेल्या प्राथमिक नजर अंदाज अहवालानुसार छत्रपती संभाजीनगर विभागात आंबा फळपिकाचे एकूण बाधित क्षेत्र ८७.८५ हे. आहे. विभागातील सर्व जिल्ह्यात काजू पिकाचे क्षेत्र निरंक आहे

(२) हे खरे आहे.

विभागीय कृषी सहसंचालक छत्रपती संभाजीनगर कार्यालयास 'मॅन्गो ग्रोअर्स असोसिएशन' आणि 'महाकेशर आंबा बागायतदार संघ' यांचे दिनांक १३/०४/२०२६ रोजीचे निवेदन प्राप्त आहे.

(३) होय, हे खरे आहे. रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात बागायतदारांनी अशी मागणी केली आहे.

(४) राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत, नवीन कृषी महाविद्यालयांचे तसेच नवीन संशोधन केंद्राचे शासनावरील दायित्व विचारात घेवून दिनांक २०/०३/२०२५ रोजी झालेल्या मा.मुख्यमंत्री महोदयांच्या बैठकीतील निदेशानुसार सदरचे दायित्व कमी होईपर्यंत नवीन कृषी महाविद्यालये/संशोधन केंद्रे स्थापन न करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

(५) माहे एप्रिल, २०२६ मध्ये अवकाळी पाऊस/वादळीवारे/गारपीट यामुळे बाधित क्षेत्राचे पंचनामे करण्यात आले आहेत. माहे मे, २०२६ मधील बाधित क्षेत्राच्या पंचनाम्याची कार्यवाही सुरु आहे कडाक्याची थंडी, अवेळी पाऊस व वातावरणातील बदलामुळे झालेल्या नुकसानग्रस्त क्षेत्राचे सर्वेक्षण करुन संयुक्त पंचनामे करण्यात आले आहेत.

-----------------

## अमरावती जिल्ह्यातील वाळू घाट लिलाव प्रक्रिया प्रलंबित असल्याबाबत

**(३३)** * **९७२५ श्री.संजय खोडके :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील एकूण ५३ वाळू घाटांपैकी ३३ घाटांचे लिलाव यशस्वीरित्या पार पडले असून, उर्वरित २० घाटांचे लिलाव तांत्रिक अडचणी व प्रशासकीय कारणांमुळे अद्याप प्रलंबित असून याचा फायदा घेऊन जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा व वाहतूक सुरू असून, या प्रकरणी प्रशासनाने माहे एप्रिल, २०२५ ते मार्च, २०२६ या कालावधीत अवैध उपसा करणाऱ्यांवर ३६७ गुन्हे दाखल केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सन २०२५ मध्ये नवीन वाळू धोरण जाहीर केले असले तरी, स्थानिक पातळीवर त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्यामुळे सर्वसामान्यांना वाळूचा प्रचंड तुटवडा भासत असून अवैध वाळू विक्रीमध्ये वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अमरावती जिल्ह्यातील बांधकाम व इतर विकासकामांसाठी माफक दरात वाळू उपलब्ध करून देण्यासाठी उर्वरित घाटांचे लिलाव तात्काळ करण्याबाबत तसेच अवैध वाळू उपसा व वाहतूक रोखण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) सुधारित वाळू निर्गती धोरण-२०२५, दिनांक ०८/०४/२०२५ शासन निर्णयानुसार अमरावती जिल्ह्यातील पर्यावरण अनुमती प्राप्त ५३ वाळू घाटाचे दिनांक २४/१०/२०२५ ते २०/०३/२०२५ या कालावधीमध्ये ई-निविदा प्रक्रिया ८ वेळा प्रत्येकी दोन मुदतवाढीसह राबविणेत आल्यानंतर ५३ घाटापैकी ३३ घाटाचे लिलाव प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण झाली. उर्वरित २० घाटाचे फेरलिलाव घेवून व मुदतवाढ देवून सुध्दा एकही वाळू घाटास प्रतिसाद प्राप्त झालेला नाही. त्यामुळे उर्वरित २० वाळू घाट शासनाच्या वाळूधोरणानुसार स्थानिक वापराकरीता उपलब्ध करुन देण्याबाबत सर्व संबंधित तहसिलदार यांना निर्देश दिलेले आहेत.

जिल्ह्यातील उर्वरित वाळूघाटातून अवैध वाळू उपसा व वाहतूक प्रकरणी महसूल पथकामार्फत दिनांक ०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ या कालावधीमध्ये एकूण २६८ प्रकरणी कारवाया करण्यात येवून २६ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(२) व (३) वाळू/रेती निर्गती धोरण-२०२५, दिनांक ०८/०४/२०२५ व दिनांक ३०/०४/२०२५ च्या शासन निर्णयान्वये पर्यावरण अनुमती प्राप्त वाळू गटापैकी जे वाळू गट लिलावामध्ये गेलेले नाहीत. परत वाळू गटामधील वाळू घरकुल लाभार्थ्यांना व इतर स्थानिक वापरासाठी उपलब्ध करुन देण्याबाबत सुस्पष्ट आदेश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार वाळू उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

अमरावती जिल्ह्यातील लिलावात न गेलेले उर्वरित २० वाळूघाट शासनाच्या वाळू धोरणानुसार स्थानिक वापराकरीता उपलब्ध करून देण्याबाबत सर्व संबंधित तहसिलदार यांना निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार लिलावात न गेलेल्या उर्वरित वाळूगटामधून एकूण १००० ब्रास वाळू स्थानिक वापराकरीता उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांचा अपघाती मृत्यू झाल्यास पालकांना देण्यात येणाऱ्या सानुग्रह अनुदानात वाढ करण्याबाबत

**(३४) * ९१०४ श्री.अमित गोरखे, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांचा अपघाती मृत्यू झाल्यास, त्यांच्या पालकांना मिळणारी आर्थिक मदत २ लाख रुपयांवरून ५ लाख रुपये करण्याची महत्त्वपूर्ण शिफारस अनुसूचित जमाती कल्याण समितीने राज्य शासनाकडे केली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाढत्या महागाईचा आणि संबंधित कुटुंबांच्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीचा विचार करता सदर प्रस्तावास अंतिम मंजुरी देऊन त्याबाबतचा शासन निर्णय (GR) निर्गमित करून सदर शिफारशीची अंमलबजावणी करण्यासंदर्भात शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक ऊईके :** (१) व (२) होय.

अनुसूचित जमाती कल्याण समितीच्या शिफारशीस अनुसरुन आदिवासी विद्यार्थ्यांचा अपघाती मृत्यू झाल्यास शासनामार्फत देण्यात येणाऱ्या सानुग्रह अनुदानात वाढ करण्याची बाब शासनस्तरावर विचाराधिन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ‘सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजने’चा निधी वितरीत न केल्याबाबत

**(३५) * ९८४८ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत इयत्ता ५ वी ते ७ वी आणि इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थिनींसाठी असलेल्या 'सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना' अंतर्गत मागील तीन वर्षांपासूनचा सुमारे रुपये ३५ लाख इतका निधी शासनाकडे प्रलंबित असून सदर शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थिनींच्या बँक खात्यात थेट जमा न झाल्यामुळे राज्यातील हजारो गोरगरीब विद्यार्थिनींना आर्थिक व शैक्षणिक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२३ पूर्वी ही शिष्यवृत्ती जिल्हा नियोजनच्या (डीपीसी) निधीतून दिली जात होती, मात्र सामाजिक न्याय विभागाने ती स्वतंत्र हेडमधून देण्याचा निर्णय घेऊनही अद्याप स्वतंत्र हेड तयार न झाल्याने राज्यातील सुमारे ५० कोटी रुपयांचा आणि नागपूर जिल्ह्यातील ३५ लाख रुपयांचा निधी थकीत आहे तसेच सामाजिक न्याय विभागाने सदर शिष्यवृत्ती वितरित करण्याची प्रक्रिया ऑनलाइन केल्यामुळे उद्भवलेल्या तांत्रिक अडचणी आणि तांत्रिक गुंतागुंतीमुळेही विद्यार्थिनींना त्यांच्या हक्काच्या लाभापासून वंचित राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनेंतर्गत राज्यातील सर्व पात्र विद्यार्थिनींची एकूण किती रकमेची शिष्यवृत्ती थकीत आहे तसेच हा प्रलंबित निधी संबंधित विद्यार्थिनींच्या खात्यात किती कालावधीत जमा करण्यात येणार आहे,
(४) असल्यास, राज्यभरात काही बँकांचे विलीनीकरण झाल्यामुळे आणि विद्यार्थिनींच्या बँक खात्यांशी आधार कार्ड लिंक नसलेल्या प्रकरणांमध्ये तांत्रिक स्तरावर निधी प्रलंबित असल्याने जिल्हास्तरावरून अशा सर्व प्रकरणांची पडताळणी सुरू आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू प्रलंबित निधी संबंधित विद्यार्थिनींच्या खात्यात जमा करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१) हे खरे नाही.

मागील तीन शैक्षणिक वर्षांसाठी या योजनांकरीता उपलब्ध असलेली १००% अर्थसंकल्पित तरतूद शासनाकडून वितरित करण्यात आलेली आहे.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

सदर योजनेकरीता शासनाने दिनांक १०/०६/२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्वतंत्र लेखाशिर्षास मंजुरी दिली आहे. तसेच विभागाने निर्गमित केलेल्या सूचनांनुसार सदर योजनेंतर्गत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणीमुळे ऑनलाईन प्रक्रियेद्वारे जरी लाभ प्रदान करता आला नाही तरी पर्यायी व्यवस्था म्हणून ऑफलाईन पध्दतीने लाभ अदा करण्याबाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच या योजनेंतर्गत राज्यातील सर्व पात्र विद्यार्थीनींची एकूण रुपये १,८७,६१२०० (१.८७ कोटी) इतकी शिष्यवृत्ती रक्कम प्रलंबित असून यापैकी नागपूर जिल्ह्यातील विद्यार्थीनींची रुपये ५४.५२ लाख इतकी शिष्यवृत्ती प्रलंबित आहे. त्यानुषंगाने चालू आर्थिक वर्षामध्ये विद्यार्थीनींच्या बॅंक खात्यात शिष्यवृत्ती अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) व (५) अंशत: खरे आहे.

ज्या विद्यार्थीनींचे आधारकार्ड लिंक नसल्यामुळे बँक खात्यातील विद्यार्थीनींची परत आलेली रक्कम पडताळणी करुन विद्यार्थीनींचे आधार संलग्न बँक खात्याची माहिती प्राप्त करुन शिष्यवृत्ती अदा

करण्यात येत आहे.याशिवाय विद्यार्थीनींमध्ये त्यांचे बँक खाते आधार संलग्नीकृत करण्याबाबतची जागृती संबंधित क्षेत्रिय कार्यालयामार्फत करण्यात येते.

-----------------

## राज्यात विदर्भातील आदिवासी दुर्गम भागातील महिलांकरीता कुर्मा घर योजनेची व्याप्ती वाढविण्याबाबत

**(३६) * १०१०० श्री.प्रमोद जठार :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील गडचिरोली व गोंदिया जिल्ह्यांतील काही आदिवासी दुर्गम भागात (उदा. भामरागड/हेमलकसा, सालेकसा, एटापल्ली इत्यादी) प्रथेनुसार महिलांना मासिक पाळीच्या कालावधीत तसेच प्रसूतीनंतर सुरुवातीचे काही दिवस नवजात बालकांसह मुख्य घराबाहेर राहणे बंधनकारक असते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कालबाह्य प्रथेमुळे मूलभूत सुविधांचा अभाव असलेल्या तात्पुरत्या झोपड्यांमध्ये राहावे लागत असल्याने, अनेक माता व नवजात बालकांना तीव्र कुपोषण, संसर्ग आणि वन्य प्राण्यांच्या हल्ल्यांसारख्या गंभीर दुर्घटनांना सामोरे जावे लागल्याच्या घटना निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संवेदनशील समस्येवर मात करण्यासाठी आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत काही गावांमध्ये प्राथमिक सुविधांनी युक्त ‘कुर्मा घरे’ (सुरक्षित महिला विश्राम गृहे) उभारण्यात आली आहेत मात्र त्यांची संख्या अत्यंत कमी प्रमाणात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सद्य:स्थितीत विदर्भातील आदिवासी बहुल व दुर्गम भागांत शासनामार्फत एकूण किती ‘कुर्मा घरे’ कार्यरत आहेत आणि सर्व संवेदनशील गावांमध्ये अशा सुरक्षित सुविधा पुरविण्याबाबत शासनाचा काही विशेष कृती आराखडा किंवा प्रस्ताव विचाराधीन आहे काय,

(५) असल्यास, या दुर्गम भागातील महिलांना आरोग्य शिक्षण देणे, अंधश्रद्धा निर्मूलन करणे आणि आधुनिक आरोग्य सुविधा जागेवरच उपलब्ध करून देण्यासाठी आदिवासी विकास विभाग व आरोग्य विभागाने संयुक्तपणे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक ऊईके :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड तालुक्यामध्ये २१, एटापल्ली मध्ये १९, धानोरा मध्ये १० व आरमोरी मध्ये ०१ असे एकूण ५१ कुर्मा घरांचे बांधकाम उमेद (महाराष्ट्र राज्य ग्रामिण जीवनोन्नती अभियान, गडचिरोली) यांचे मार्फत करण्यात आलेले आहे. तसेच कोणत्याही ग्रामसभांकडून कुर्मा घरे उभारण्याबाबतचे मागणीचे प्रस्ताव प्रकल्प कार्यालय, गडचिरोली, भामरागड, अहेरी जिल्हा गडचिरोली व प्रकल्प कार्यालय, देवरी जि.गोंदिया या प्रकल्प कार्यालयात प्राप्त झालेले नसल्याने कोणताही विशेष कृती आराखडा किंवा प्रस्ताव विचाराधीन नाही.

(५) i. आदिवासी दुर्गम भागातील महिलांना आरोग्य शिक्षण देणे, अंधश्रध्दा निर्मुलन करणे आणि आधुनिक आरोग्य सुविधा जागेवर उपलब्ध करुन देण्यासाठी आदिवासी विकास विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग व महिला व बालकल्याण विभाग यांचे अंतर्गत जननी सुरक्षा योजना, माहेर घर योजना, प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजना, ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना, मुलींच्या शिक्षणाकरीता तसेच सक्षमीकरणाकरीता लेक लाडकी योजना राबविण्यात येतात.

ii. आदिवासी दुर्गम भागात मोबाईल मेडिकल युनिट्स व भरारी पथक योजना अंतर्गत वैद्यकिय अधिकारी यांचेमार्फत गावात, घरापर्यंत वैद्यकिय सेवा पुरविण्यात येतात तसेच बहुउद्देशीय आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत गृहभेटीव्दारे आरोग्य सेवा प्रदान करण्यात येतात.

-----------------

## सोलापूर-धाराशिव या नवीन रेल्वे मार्गासाठीच्या भूसंपादन प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३७) * १०४३२ अॅड.अनिल परब :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर-धाराशिव या नवीन रेल्वे मार्गासाठी सोलापूर जिल्ह्यातील सुमारे १८८ हेक्टर भूसंपादनाच्या मोबदल्याबाबत तत्कालीन भूसंपादन अधिकारी यांच्या कार्यकाळात मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार व अनियमितता झाल्याच्या प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांनी गठीत केलेल्या चौकशी समितीने संबंधित भूसंपादन प्रक्रियेत सुमारे रुपये १४० कोटी रुपयांचे अतिरिक्त वाटप झाल्याचा निष्कर्ष काढणारा चौकशी अहवाल माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये किंवा त्यासुमारास सादर केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांनी सदर प्रकरणाचा अंतिम चौकशी अहवाल व संबंधित दोषी भूसंपादन अधिकाऱ्याविरुध्द विभागीय चौकशी सुरू करण्याचा प्रस्ताव माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये किंवा त्यासुमारास शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपूर्ण प्रकरणात एकूण किती रुपयांचा गैरव्यवहार झाला आहे व यामध्ये तत्कालीन भूसंपादन अधिकाऱ्यांव्यतिरिक्त महसूल व भूमी अभिलेख विभागाच्या आणखी कोणत्या अधिकाऱ्यांचा व कर्मचाऱ्यांचा समावेश आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर अहवालाच्या अनुषंगाने दोषी भूसंपादन अधिकाऱ्याविरुध्द विभागीय चौकशी सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच महसूल व भूमी अभिलेख विभागाच्या अन्य दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) सोलापूर-तुळजापूर-उस्मानाबाद नवीन रेल्वे लाईन प्रकल्पासाठी सोलापूर जिल्ह्यातील १० गावांमधील १८८.३ हे.आर जमिनी संपादीत करण्यात आल्या आहेत. याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने अपर जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीने याबाबतचा अहवाल शासनास सादर केला आहे.

सदर अहवालावरुन विशेष भूसंपादन अधिकारी क्र.७ (मोहोळ), सोलापूर यांनी सदर प्रकरणामध्ये केलेले मुल्यांकन आणि सहायक संचालक, नगररचना, सोलापूर यांच्याकडील मुल्यांकन अहवालामध्ये १४१,०१,४८,९७६/- इतक्या रकमेची वाढ असल्याबाबत जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी शासनास कळविले आहे.

तसेच जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या अहवालानुसार रेल्वे या भूसंपादन संस्थेकडून प्राप्त ५८६ कोटी रकमेपैकी ४२६ कोटी एवढ्या रकमेचे भूधारकांना वाटप करण्यात आले असून उर्वरित मोबदला रुपये १४९ कोटी वाटप प्रक्रिया सुरु आहे.

(३), (४) व (५) जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी कळविल्यानुसार सदर प्रकरणी मुल्यांकनातील तफावत/वाढ विचारात घेऊन करावयाच्या कारवाईच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, पुणे यांना शासनास शिफारस करण्याबाबत कळविण्यात आले आहे. सदर शिफारशी प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही नियोजित आहेत.

-----------------

## अमरावती वनवृत्तातील वनरक्षक भरती प्रक्रिया-२०२३ मधील 'पेसा' क्षेत्रातील रिक्त पदे प्रतिक्षा यादीतील उमेदवारांमधून भरण्याबाबत

**(३८)** * **१०५१९ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती वनवृत्तातील वनरक्षक भरती प्रक्रिया-२०२३ मध्ये अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) एकूण २३० पदांपैकी, अनुसूचित जमाती (पेसा) माजी सैनिकांची ३५ पदे व अनाथ प्रवर्गाची ०२ पदे पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे अद्याप रिक्त राहिली असल्याचे निदर्शनास आले असून सदर रिक्त पदे सर्वसाधारण गुणवत्तेनुसार प्रतीक्षा यादीतील पात्र अनुसूचित जमाती (पेसा) उमेदवारांना संधी देऊन सदर पदे भरण्यात यावीत, या मागणीचे निवेदन उमेदवारांनी दिनांक २२ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यादरम्यान संबंधित प्रशासनाकडे सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गडचिरोलीसह राज्यातील इतर अनुसूचित क्षेत्रांतील (पेसा) जिल्ह्यांमध्ये माजी सैनिक प्रवर्गातील पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे, तेथील प्रतीक्षा यादीतील इतर पात्र 'पेसा' उमेदवारांना नियुक्ती देण्याची शासकीय कार्यवाही करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अमरावती वनवृत्तातील रिक्त राहिलेली माजी सैनिक व अनाथ प्रवर्गाची एकूण ३७ पदे प्रतीक्षा यादीतील पात्र अनुसूचित जमाती (पेसा) उमेदवारांमधून भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

वनरक्षक सरळसेवा भरती-२०२३ मध्ये ११ वनवृत्तांपैकी ९ वनवृत्तांमध्ये अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) क्षेत्रात माजी सैनिक या समांतर आरक्षण प्रवर्गात भरावयाची होती. सदर ९ वनवृत्तांपैकी गडचिरोली, चंद्रपूर, नाशिक या वनवृतांनी पेसा क्षेत्रातील माजी सैनिक या समांतर आरक्षण प्रवर्गातील उमेदवार

उपलब्ध न झाल्यामुळे त्यांनी सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक दिनांक २५/०१/२०२४ मधील निर्देशानुसार प्रादेशिक निवड समितीने जाणीवपुर्वक निर्णय घेवून सदर रिक्त पदे प्रतिक्षायादीतील पात्र सर्वसाधारण उमेदवारांमधुन भरण्यात आली आहेत.

(३) प्रस्तुत प्रकरणी सामान्य प्रशासन विभागाने दिलेले अभिप्राय विचारात घेता, पेसा क्षेत्रातील उमेदवारांना मानधन तत्वावर दिलेल्या नियुक्त्या या मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल असलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२२१०९/२०२३ च्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून देण्यात आलेल्या आहेत. सबब, पेसा क्षेत्रातील १७ संवर्गातील पदांवर मानधन तत्वावर देण्यात आलेल्या नियुक्त्या या एकवेळची विशेष बाब म्हणून केलेली तरतूद होती. सबब, पेसा क्षेत्रातील निवडसूचीमधील रिक्त पदे प्रतिक्षायादीतून भरणे संयुक्तिक होणार नसलेबाबत संबंधितांना शासन पत्र दिनांक १४/०८/२०२५ व दिनांक १८/०६/२०२६ अन्वये कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तळोदा (जि.नंदुरबार) येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात भोजन पुरवठा देयकांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३९)** * **१०२०४ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, तळोदा (जि.नंदुरबार) येथील शासकीय आश्रमशाळा व वसतिगृहांच्या भोजन पुरवठा देयकांमध्ये लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची बाब माहे मार्च, २०२६ च्या अंतिम आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी विद्यार्थ्यांची पटसंख्या आणि प्रत्यक्ष पुरवठा झालेली भोजनाची देयके यात तफावत असल्याचे प्राथमिक स्तरावर निदर्शनास आले असून, शासकीय निधीचा गैरविनियोग झाल्याने आदिवासी विकास विभागाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत तात्काळ उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले असून सदर प्रकरणात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील महसूल व आदिवासी विकास विभागाच्या सहाय्यक प्रकल्प अधिकाऱ्यांचा थेट सहभाग असल्याच्या तसेच त्यांच्या चौकशी अहवालात त्रुटी आढळल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाने किंवा आदिवासी विकास विभागाने उक्त प्रकरणी कोणतीही उच्चस्तरीय चौकशी समिती गठीत केली आहे काय, आणि सदर चौकशीचे मुख्य निष्कर्ष काय आहेत त्यानुसार शासकीय निधीचा अपहार करणाऱ्या संबंधित दोषी अधिकारी, कर्मचारी व कंत्राटदार यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक ऊईके :** (१) नाही.

(२) व (३) प्रकल्प कार्यालय तळोदा अंतर्गत भोजनाच्या - देयकाबाबत कोणतीही तक्रार प्राप्त नाही. तथापि, सन २०१६ ते २०२० या दरम्यान भोजन पुरवठा देयकाचे बनावट हजेरी पट दस्तऐवज तयार करुन शासनाची फसवणूक केल्या प्रकरणी गुन्हा नोंद झाला असून श्री.यु.एन.राऊत तत्कालीन गृहपाल/गृहप्रमुख

प्रकल्प कार्यालय, छत्रपती संभाजीनगर याना दिनांक २३/०३/२०२६ रोजी प्रकल्प कार्यालय तळोदा येथे कार्यरत असताना तेथून पोलीस पथकाने चौकशीसाठी अटक केली. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत अपर आयुक्त, अमरावती यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## किनवट (जि.नांदेड) तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांना मंजूर पीक विमा रक्कम बँक खात्यात जमा झाली नसल्याबाबत

**(४०) * ९२०६ श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट (जि.नांदेड) तालुक्यातील हजारो पात्र शेतकऱ्यांच्या नावावर पीक विमा पोर्टलवर विम्याची रक्कम मंजूर असल्याचे दिसत असूनही प्रत्यक्षात मात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ती अद्याप जमा झालेली नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खरीप हंगाम २०२५ मध्ये किनवट तालुक्यातील शेतकऱ्यांनी प्रति हेक्टर ५९२ रुपये विमा हप्ता भरून विमा संरक्षण घेतलेले असताना आणि ऑक्टोबर, २०२५ मधील अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यामुळे पंचनामे पूर्ण होऊन अहवाल सादर केलेला असतानाही, विमा कंपनीकडून पोर्टलवर केवळ नावापुरतीच रक्कम दाखविली जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोर्टलवर रक्कम दिसत असतानाही तांत्रिक कारणास्तव किंवा विमा कंपनीच्या दिरंगाईमुळे ही रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करण्यात आलेली नसल्याने आगामी खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांपुढे आर्थिक संकट उभे राहिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधित विमा कंपनीला पात्र लाभार्थ्यांच्या खात्यात विम्याची रक्कम त्वरित जमा करण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) किनवट (जि.नांदेड) तालुक्यातील खरीप, २०२५ साठी ४३,५२१ विमा अर्जाद्वारे प्रधानमंत्री पीक विमा योजनेत शेतकऱ्यांनी सहभाग घेतला आहे. त्यापैकी पात्र शेतकऱ्यांना रुपये ३२.६१ कोटी इतकी नुकसान भरपाई निश्चित झाली आहे. त्यापैकी रुपये १०.३४ कोटी इतकी नुकसान भरपाई देण्यात आली असून, उर्वरित नुकसान भरपाई देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२), (३) व (४) सन २०२५-२६ पासून राबविण्यात येत असलेल्या सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत विमाक्षेत्र घटकातील पीक कापणी प्रयोगावरुन उपलब्ध झालेले उत्पन्नाच्या सरासरी आकडेवारीवर नुकसान भरपाई निश्चित केली जाते. त्यामुळे अतिवृष्टी किंवा अन्य कारणांमुळे पिकांचे नुकसान झाल्यास, पीक कापणी प्रयोग व तांत्रिक उत्पादन या निकषांच्या आधारे पडताळणी केल्यानंतर संबंधित पीक हंगामात उंबरठा उत्पादनापेक्षा उत्पादनात घट झाल्यास नुकसान भरपाई देय होते. त्यानुसार नुकसान भरपाईची परिगणना करण्यात आली असून, नुकसान भरपाई वाटप करण्यात येत आहे.

एकूण विमा हप्त्याच्या ११०% वरील नुकसान भरपाईची रक्कम भारतीय कृषी विमा कंपनीस अदा करण्यात आली असून, त्यानुसार उर्वरित पात्र शेतकऱ्यांना प्रलंबित नुकसान भरपाईचे वितरण करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती येथे आदिवासी विकास विभागाच्या अभ्यासिकेसाठी अवाजवी दराने जागा भाडेत्तवावर घेतल्याबाबत

**(४१) * ९७३२ श्री.संजय खोडके :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील राजकमल चौकातील एका खाजगी मॉलमध्ये आदिवासी विकास विभागामार्फत दरमहा रुपये ८ लाख ६८३ या अवाजवी दराने अभ्यासिका भाड्याने घेण्यात आल्याचे माहे मे,२०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अभ्यासिका भाड्याने घेण्याचा करार करताना, वित्त विभागाचे शासन निर्णय आणि जागा भाड्याने घेण्याबाबतच्या विहित कार्यपध्दतीचे उल्लंघन झाल्याची बाब दिनांक ९ मे, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून सदर जागेची भाडे निश्चिती करताना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ऑनलाईन पोर्टलचा अधिकृत ‘कार्यालयीन आयडी’ न वापरता, बाह्य स्तरावरून किंवा त्रयस्थ यंत्रणेकडून बनावट माहितीच्या आधारे भाडे निश्चितीचा अहवाल तयार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गाडगेनगर पलाश गल्ली येथे माहे डिसेंबर, २०२४ पासून शासनाची स्वतःची स्वतंत्र सव्वाशे विद्यार्थी क्षमतेची सुसज्ज अभ्यासिकेची इमारत पूर्ण तयार असताना, जाणीवपूर्वक तिचा ताबा घेण्यास दिरंगाई करून खाजगी मॉलमध्ये अभ्यासिका सुरू करण्याची कारणे काय आहेत तसेच यामुळे शासनाचे अंदाजे किती आर्थिक नुकसान झाले आहे,

(४) असल्यास, सदर खाजगी मॉल मधील अभ्यासिकेत विद्यार्थ्यांची सरासरी उपस्थिती केवळ ५ ते १० टक्के असतानाही, शासनास अतिरिक्त विद्युत देयके व इतर देखभालीचा खर्च करावा लागत असून दिनांक ३१ मार्च, २०२८ पर्यंतचा दीर्घकालीन नियमबाह्य करार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नियमबाह्य करार करून शासनाचे आर्थिक नुकसान करणाऱ्या आणि शासकीय इमारतीचा ताबा घेण्यास दिरंगाई करणाऱ्या दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक ऊईके :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

(३) अमरावती शहरातील वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी दिनांक ०३/१२/२०२४ रोजी अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती येथे अद्यावत ग्रंथालय/अभ्यासिका उपलब्ध करुन देण्याबाबत आंदोलन व लॉंग मार्च केले होते. तद्नुषंगाने खाजगी मॉलमध्ये भाडेतत्वावर अभ्यासिका सुरु करण्यात आली आहे.

उपविभागीय अभियंता, सा.बां.(आदिवासी उपविभाग), धारणी यांनी दिनांक ०९/०६/२०२६ च्या पत्रान्वये गाडगेनगर, अमरावती येथील ग्रंथालयाच्या इमारतीचे बांधकाम, फर्निचर व विद्युतीकरण पूर्ण झाले असल्याबाबत प्रकल्प अधिकारी, धारणी यांना कळवून इमारत तात्काळ ताब्यात घेण्याबाबत कळविले आहे.

सदर प्रकरणी इमारत मालकाला कोणतेही देयक अदा करण्यात आलेले नाही. तसेच विद्युत देयक, पाणीपुरवठा देयक अदा करण्यात आलेले नाही.

(४) अंशत: खरे आहे.

(५) सदर प्रकरणी चौकशी करण्यासाठी अपर आयुक्त, अमरावती यांनी दिनांक ११/०५/२०२६ रोजी चौकशी समिती गठीत केली होती. सदर समितीने दिनांक २९/०५/२०२६ रोजी अहवाल सादर केला असून संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित होणे आवश्यक असल्याचा निष्कर्ष नोंदविला आहे.

अपर आयुक्त कार्यालयाने वसतिगृहाचे तत्कालीन प्रभारी गृहप्रमुख आणि गृहप्रमुख (आहरण व संवितरण प्रभार) यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे. त्यांच्याकडून खुलासा प्राप्त होताच पुढील कार्यवाही नियोजित आहे.

-----------------

## आदिवासी विकास विभागाच्या चौकीदार पदभरतीत आरक्षणाच्या विहित क्रमवारीत बदल केल्याबाबत

**(४२) * ९८४९ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागामार्फत (जि.नागपूर) २२ प्रकल्प कार्यालयात माहे एप्रिल, २०२६ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या चौकीदार पदाच्या ४१६ जागांच्या भरती जाहिरातीमध्ये 'अनुसूचित जमाती' (ST) प्रवर्गासाठी एकही जागा राखीव ठेवण्यात आलेली नसून दिनांक २७ मार्च, १९९७ व दिनांक २९ मे, २०१७ च्या शासन निर्णयानुसार कोणत्याही पदभरतीमध्ये आरक्षणाच्या क्रमवारीत पहिले पद अनुसूचित जमाती व अनुसूचित जाती प्रवर्गाला मिळत होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामान्य प्रशासन विभागाने दिनांक २५ फेब्रुवारी, २०२२ च्या जारी केलेल्या बिंदू नियमावलीच्या नियमामुळे सुधारित शासन निर्णयानुसार आरक्षणाच्या या विहित क्रमवारीत बदल करून अनुसूचित जमाती (ST) व अनुसूचित जाती (SC) प्रवर्गाला बिंदू नामावलीत थेट आठव्या क्रमांकावर ढकलण्यात आले असून आदिवासी विभागात आदिवासी तरुणांना नोकरीची संधी नाकारली गेल्याने आदिवासी समाजात संताप निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मूळ आदिवासी हितरक्षणास बाधा आणणाऱ्या या बदलाबाबत आणि चौकीदार पदभरतीतील आरक्षणाच्या विसंगतीबाबत शासनाने कोणती सुधारात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक ऊईके :** (१) अंशत: खरे आहे.

चौकीदार पदाची सुधारित जाहिरात दिनांक २९/०४/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. सुधारित जाहिरातीन्वये अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी एकूण ३७ पदे राखीव ठेवण्यात आली आहे.

(२) व (३) सामान्य प्रशासन विभागाने दिनांक ०६/०३/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये छोट्या संवर्गासाठी प्रत्येक राखीव प्रवर्गास असलेली आरक्षणाची टक्केवारी विचारात घेऊन गणितीय पध्दतीने बिंदुनामावली निश्चित केली आहे.

आदिवासी बहुल जिल्ह्यातील छोट्या संवर्गातील बिंदूनामावलीसाठी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक दिनांक २३/०९/२०२५ व पेसा क्षेत्रातील बिंदूनामावलीसाठी शासन निर्णय दिनांक ११/०२/२०२६ अन्वये अनुसूचित जमाती प्रवर्गातील पहिले पद प्राधान्याने भरण्यासंदर्भात तरतूद करण्यात आली आहे.

सुधारित जाहिरातीमधून अनुसूचित जमाती प्रवर्गास पदे राखीव ठेवण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर वन विभागातील वित्तीय गैरव्यवहाराबाबत

**(४३) * १०४३४ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील वन विभागांतर्गत मियावाकी रोपवन उभारणी, वन वसाहतीमधील शासकीय निवासस्थानांची दुरुस्ती आणि जिल्हा नियोजन समितीकडून प्राप्त झालेल्या निधीच्या विनियोगात लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबतचे निवेदन ‘जनशक्ती शेतकरी संघटनेच्या’ शिष्टमंडळाने वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे यांच्याकडे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास सादर केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वित्तीय गैरव्यवहारामध्ये सोलापूर वन विभागातील संबंधित सहाय्यक वनसंरक्षक, वनपरिक्षेत्र अधिकारी आणि मुख्य लेखापाल यांचा सहभाग असल्याने सदर दोषींवर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्याच्या मागणीसाठी सदर संघटनेने दिनांक २६ जानेवारी, २०२६ रोजी पुणे येथील वनसंरक्षक कार्यालयासमोर बेमुदत उपोषण केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार शासनाचा महसूल आणि विकास निधीचा गैव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती प्रशासकीय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी दाखल तक्रारीच्या अनुषंगाने वनसंरक्षक (प्रा.), पुणे यांनी दिनांक २७/०१/२०२६ चे पत्रान्वये सहाय्यक वनसंरक्षक (कॅम्पा), सोलापूर यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली होती. चौकशी समितीने चौकशीअंती सादर केलेल्या अहवालामध्ये तक्रारीत तथ्य आढळून येत नसल्याचे नमूद केले आहे.

तथापि, संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी (रो.ह.यो.), सोलापूर यांनी दोन कामांबाबत योग्य कार्यपध्दतीचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यामुळे उप वनसंरक्षक, सोलापूर यांनी दिनांक १८/०५/२०२६ रोजीच्या ज्ञापनान्वये त्यांना सक्त ताकीद दिली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.